# मासिक शिक्षणयात्री

■ वर्ष:५ वे ■ अंक: १२ वा ■ डिसेंबर २०२० ■ किंमत:४० रुपये

खरा तो एकचि धर्म। जगाला प्रेम अर्पावे ।।
जगी जे हीन अति पतित
जगी जे दीन पद-दलित
त्या जाऊन उठवावे। जगाला प्रेम अर्पावे।।
सदा जे आर्त अति विकल
जयांना गांजती सकल
तया जाऊन हसवावे। जगाला प्रेम अर्पावे।।
कुणा ना व्यर्थ शिणवावे
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधु मानावे। जगाला प्रेम अर्पावे।।
प्रभूची लेकरे सारी
तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे। जगाला प्रेम अर्पावे।।
असे हे सार धर्माचे
असे हे सार सत्याचे
परार्थी प्राणही द्यावे। जगाला प्रेम अर्पावे।।

-साने गुरुजी



# जिल्हा परिषदेचा शिक्षक ठरला
# जगातील सर्वोत्तम शिक्षक!





सोलापूर जिल्ह्यातील परितेवाडी येथील जिल्हा परिषद शिक्षक

## श्री.रणजितसिंह डिसले

यांना युनस्को व लंडनस्थित वार्की फाऊंडेशन यांच्या
संयुक्त विद्यमाने दिला जाणारा ७ कोटी रुपयांचा
ग्लोबल टिचर पुरस्कार मिळाल्याबद्दल

## हार्दिक अभिनंदन!

..... शुभेच्छुक.....

मासिक शिक्षणयात्री परिवार
महाराष्ट्र राज्य

वाचन लेखन चळवळीला वाहिलेले मासिक

वर्ष : ५ वे

अंक:१२ वा  डिसेंबर २०२०

॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥

• मार्गदर्शक •

मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

• मानद संपादक •

सुभाषदादा कुलकर्णी

• कार्य.संपादक •

संदेश नंदकिशोर हजारे

• संपादन सहाय्य •

प्रा.डॉ.माधव कदम

युवराज माने

•प्रतिनिधी सहाय्य•

पुणे- रमेश काळे, मुंबई- जयपाल गिरासे, नाशिक-किरण पाटील, सोलापूर- उमेश काळे, औरंगाबाद- रवि गारूडकर, परभणी- युवराज माने, जळगांव- प्रविण माळी, नंदुरबार- तुकाराम धनगर, अमरावती- रूपेश माने, कोल्हापूर - गुलाब बिसेन,सातारा - विनोद भोजने, बीड - अनंत दिक्षित, लातूर - पंढरीनाथ चिभडे,

• अंक मांडणी •

प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

• मुखपृष्ठ मांडणी •

साभार आंतरजाल

• लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी
• पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील
• सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत

# अंतरंग...

३ साने गुरुजींबद्दल
८ नवी विटी नवे राज्य
११ शिक्षक एक जागल्या
१५ बुनियादी शिक्षा
१७ निसर्ग वादळ
१९ शिक्षणगंगा
२३ लायरबर्ड
२८ ऑनलाईनचा प्रताप
३३ मुखपृष्ठाबाबत प्रतिक्रिया

## मासिका विषयी ...

डिसेंबर २०२०

नोंदणी क्रमांक RNI No.MAHMAR2015/67226

वर्गणी : वार्षिक₹ ४००, द्विवार्षिक₹ ७००, त्रैवार्षिक १०००,

संपर्क : शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५.

चलभाष : 8208301001 Email:shikshanyatri11@gmail.com

संपादकीय

# सरत्या वर्षाची फळे!

होय....सरलेले वर्ष २०२०.आपल्याला खुप काही शिकवून गेलेय असे म्हटले तर काही वावगे ठरणार नाही. २०२० या वर्षाची सुरुवातच मुळी कोरोनासारख्या भयानक संकटाने झाली.नवीन वर्षाचा आनंद फारतर दोन अडीच महिने टिकला.मात्र मार्च अखेरीस सुरु झालेले कोरोना वादळ अजून शमले नाही.भितीचे सावट दूर झालेले नसतांना २०२१ या नवीन वर्षाचे आगमन होतेय.

मात्र २०२० या वर्षात कोरोनाने खुप काही शिकवले.स्वच्छतेपासून माणुसकी पर्यंतचा प्रवास साऱ्यांनाच काही तरी धडा देऊन गेला. महत्वाचे म्हणजे 'ऑनलाईन' चा वापर न थांबता चालू झाला.इतर क्षेत्र सोडली तर शैक्षणिक क्षेत्रात 'ऑनलाईन' अभ्यास चांगलाच रुळलेला दिसला.मग पारंपारीक शिक्षण हवे की ऑनलाईन शिक्षण हवे यावर सांगोपांग चर्चा होतांना दिसल्या.एरवी डिजीटलला सामोरे जातांना दचकणारा सामान्य वर्ग आता मात्र डिजीटल साहित्याला न भिता सामोरे जातोय.

आणि म्हणूनच सरत्या वर्षाने ऑनलाईन अभ्यासाची फळे खऱ्या अर्थाने सामान्यापर्यंत पोहचवून आपला दबदबा निर्माण केला आहे.आपणही सरत्या वर्षाची आज्ञा पुढील वर्षांत कितपत पाळतो हे येणारा काळच ठरवेल.

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.

उमाळा

# साने गुरुजींबद्दल...



पु.ल.देशपांडे यांचे अमळनेर(जळगांव) येथील भाषणाचा काही भाग 'उमाळा' या पुस्तकातून जसाच्या तसा... वाचकांसाठी!

आपल्या महाराष्ट्राच्या परंपरेमध्ये भगवंतापेक्षा भक्ताला महत्व जास्त आहे. आपण पंढरपूरची पालखी जाताना पाहिली असेल तर विठ्ठलाचं नांव जितक्या वेळा घेतलं जात नाही, त्याच्या दसपट ज्ञानोबा तुकाराम म्हटलं जातं. उद्या पंढरीच्या पालखीतलं ग्यानबा तुकाराम म्हणायचं नाही असा जर एखादा निर्बंध काढला तर ती पालखी ओस पडेल, याची मला खात्री आहे. कारण भक्ताच्या नांवाच्या नादामध्ये शेकडो मैल चालले जातात. मला हा मान मिळालेला आहे, याचं कारण मी सानेगुरुजीचा भक्त आहे. या भूमिकेतूनच मला हा मिळालेला मान आहे. हे मी ओळखलेलं आहे.

देवाच्या भक्तीत मला काही फारसा रस नाही. परंतु देवत्वाच्या भक्तीमध्ये मला अतिशय रस आहे आणि असं देवत्व जीवनामध्ये सहसा चटाचट आढळत नाही.पण मी एका अशा जमान्यामध्ये वाढलो. तरुण होतो. त्याकाळामध्ये जिथं नजर टाकावी तिथं देवत्व असलेली माणसं आहेत असा विश्वास वाटावा,अशी माणसं आयुष्यामध्ये पाहायला मिळाली. त्यांच्यामध्ये आपल्या अव्दितीय तेजाने तळपणारे जसे सानेगुरुजी होते, तसे जीवन म्हणजे आपली समिधा आहे. अशा रितीने वागणारे सेनापती बापट होते. बोरकरांची एक कविता आहे,

जीवन त्यांना कळले हो,  
मी पण त्यांचे पक्व फळापरि  
सहजपणाने गळले हो

तर ज्यांचं पक्व फळापरी सहजपणाने 'मी पण' गळलं,अशी माणसं माझ्या आयुष्यात मी पाहिली आहेत. त्यांच्यात सानेगुरुजींच्या तुलनेत दुसरं मला कोणीही आढळलेलं नाही. स्वत:ला इतकं वगळून जीवनामध्ये दुसऱ्यासाठी जगणं, ही किमया या पृथ्वीतलावर होऊ शकते असं जर कोणी अनुभवाला आणून दिलेलं असेल ,तर ते

सानेगुरुजींनी अनुभवाला आणून दिले. सानेगुरुजींच्या भाषेमध्ये व्याकरणामध्ये 'मी' नांवाचा शब्दच नसावा असं मला वाटतं. ते 'आम्ही' याच भावनेने जगले. त्यामुळे त्यांचा आनंद,त्यांचे चैतन्य,त्यांचे तारुण्य, त्यांचे कारुण्य,त्यांचे साहित्य हे सानेगुरुजींचे साहित्य न होता आपल्या सगळ्या हजारो लोकांची वाचा, ती सानेगुरुजींच्या लेखणीतून बाहेर पडली आहे. सानेगुरुजींनी मी साहित्यिक आहे असं कधीच म्हटलं नाही. ते म्हणायचे मला काही लिहिता येतच नाही. ज्याला उत्तम लिहिता येतं तोच असं धैर्याने सांगु शकतो की,मला काही लिहिता येत नाही. नाहीतर ज्याला अधीमुर्धी चार ओळी कवितासुध्दा लिहिता येत नाही, तो साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या मागे लागलेला असतो कि मी कवी आहे. मला स्टेजवर चान्स द्या. साने गुरुजींनी हजारो कविता लिहिल्या, पण साहित्य संमेलनात जाऊन कविता वाचाव्या असं त्यांना कधीच वाटलं नाही.कारण त्यांची धारणाच अशी होती की, 'इंद न मम' 'हे माझं नाही' आहे. भारतीय तत्त्वज्ञानात तसं जर अत्यंत सुंदर वाक्य कुठलं असेल,तर जीवनामध्ये जगताना 'इंद न मम' हे माझं नाही आहे,या भावनेनं जगायचं, सानेगुरुजी 'इंद न मम' या भावनेने जगले. सानेगुरुजीच्या साहित्याचा मूळ स्त्रोत विचाराल तर तुकोबांनी सांगितल्या प्रमाणे-

'फोडिले भांडार,धन्याचा हा माल, मी तो हमाल भार वाही ' या भावनेनं सानेगुरुजींनी लोकांच्या साठी लिहिलं. सानेगुरुजींनी साहित्यिक होण्यासाठी साहित्य लिहिलं असतं,तर ते फारतर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊन दुसऱ्या वर्षी विसरले गेले असते. परंतु त्यांनी साहित्यिक,ग्रंथकर्ता म्हणुन साहित्य लिहिले नाही आणि तसं न लिहिण्याचीच या भारतामध्ये परंपरा आहे. ही परंपरा आपण विसरतो. भारतातील परंपराच अशी आहे की, आपण उत्तम काही केलं तर शक्य तितकं नामानिराळं व्हावं. मी तुम्हाला या अजिंठाच्या परिसरातल्या लोकांना सांगावं असं नाही. अजिंठा, वेरुळला उत्कृष्ट शिल्प केलेले आहे.पण एकही शिल्पकाराने आपलं नावं लिहिलेलं नाही.पाहायला येणारे लोक मात्र आपली नावं लिहितात तिथं, गायकवाड गुरुजी, ७ वी अ,अमुक शाळा इुली अलिप्त राहण्याची परंपरा आहे. हा कोण आहे. यांच्याशी तुम्हाला काय करायचं?

सानेगुरुजींचा विचार अगदी साधा होता की, यथार्थपणाने जगायचे असेल तर दुसऱ्यासाठी जगा हा इतका साधाच उपदेश होता. सानेगुरुजींनी जीवनामध्ये सगळ्यात जर विचार कसला केला असेल तर तो दुसऱ्याचा केला आणि संस्कृती याचा अर्थच मी असा करतो की, दुसऱ्याचा विचार प्राधान्याने मानणे म्हणजे संस्कृती. या जगामध्ये मला जसा जगायचा हक्क आहे. तसा हक्क असणारे हजारो लोक आहेत. हे मानणे म्हणजे संस्कृती.ज्याला इंग्लिशमध्ये 'रुल्स ऑफ द रोड 'म्हणतात. मीच डाव्या बाजुने का चालायचे ? जर सगळयांनीच मधून चालायचे ठरवले,तर असंख्य मुडदेच रस्त्याला दिसायला लागतील. माझा जरी नसला,तरी माझ्या जवळच्या माणसाचा दिसेल.म्हणुन मला हे पाळले पाहिजे. दुसऱ्या चा विचार करुन मला चांगले वाटले पाहिजे, यासाठी केले पाहिजे याचे कारण काय ? तर माणुसकीचा पहिला धर्म सानेगुरुजींनी सांगितला तो हा आहे की, इतर प्राण्यांना न मिळालेली अशी एक देणगी मनुष्य प्राण्याला मिळालेली आहे. ती म्हणजे दुसऱ्याविषयी सहानुभूती. एका कुत्र्याने दुसऱ्या कुत्र्याला दगड मारला, तर या कुत्र्याच्या डोळ्यांमध्ये पाणी आलेले मी पाहिले नाही. किंवा बैलगाडी ओढतांना एका बैलाला फटका मारला तर बाजूचा

बैल संपावर गेला. असे काही आपण ऐकलेले नाही. संपावर माणसे योग्य कारणासाठी जातात. असे नाही; पण तरीसुध्दा असा गेला आहे, असे होत नाही. पण आपल्याला मात्र दुसऱ्यांचे दुःख पाहुन,त्याला झालेल्या वेदना पाहून, आपल्याही त्या व्हाव्यात अशी योजना निसर्गाने दिलेली आहे. आणि अशी योजना निसर्गाने करुन देताना एक प्रचंड अशी काही निर्मिती, मी याला निर्मितीच म्हणतो, अशी निसर्गाने आपल्यामध्ये ठेवलेली आहे.या निर्मितीला आपण 'अश्रू'असे म्हणतो. इतकी सुंदर निर्मिती या जीवनामध्ये दुसरी कुठलीही नाही. माणसे माणूसपण सगळ्यात जास्त त्याच्या डोळ्यांतून झरणाऱ्या आसवांतून प्रकट होते. म्हणुन आईचे मोठेपणा सांगताना गडकऱ्यांनी इतके सुंदर लिहिरे आहे की,

हे हृदय असे आईचे,मी उगाच सांगत नाही,
जे आनंदेही रडते, दुःखात कसे ते होई?

त्या आनंदानेही तिच्या डोळ्यांतून पाणी येते. ते पाणी दिसायला लागते आपल्याला, त्यावेळी मनाला स्नान घडते. त्यावेळी ते आलेले आसू, हे तीर्थ म्हणून आलेले असतात. पाणी आणि तीर्थ यांच्यातला फरक तरी काय? पाणी हे आपल्या शरिराला स्नान घालते आणि तीर्थ हे आपल्या मनाला स्नान घालते. मनाला जे द्रव स्नान घालते, त्यालाच आपण तीर्थ म्हणतो आणि अशा प्रकारे 'अश्रू' तीर्थ जसे धारा तीर्थ असते, वरुण तीर्थ असते, काशी तीर्थ असते.अशा प्रकाराच्या पवित्र अश्रू तीर्थामध्ये सानेगुरुजींनी आपल्या साहित्यातून आपल्याला उभे करुन दिले आहे. ज्यांना सानेगुरुजी कळले नाही, ते गधडे म्हणालेत की, सानेगुरुजींचे वाङ्मय म्हणे रडके होते. ज्या माणसांना जीवनातल्या आसवांचे महत्व कळलेले नाही, त्या माणसांना केवळ आणखी दोन पाय नाहीत म्हणुन माणूस म्हणायचे,यापलिकडे काय अर्थ? सानेगुरुजी रडके नि हे शहाणे! साहेबांचे बूट चाटत ज्यांचे आयुष्य गेले,त्यांनी सानेगुरुजींना अशक्त, बुईक, दुबळे म्हणावे! सानेगुरुजींचे विश्वरुप सौम्य दर्शन पुष्कळांना झालेले असेल,पण सानेगुरुजींचे विश्वरुप दर्शन ज्यांना झाले, त्यांना सौम्य आणि विश्वरुप त्यांच्यातला फरक त्यावेळेला पाहायला मिळाल.

मला त्यांचा एक प्रसंग आठवतो, एरवी सानेगुरुजींना मी लहान मुलांना गोष्टी सांगताना पाहिले. त्या गोष्टी सांगताना त्या मुलांत लहानात लाहान मूल जर कोणी असेल,तर सानेगुरुजी हाच मनुष्य होता. ही मुले मोठी वाटावीत इतके गुरुजी छोटे वाटायचे. हे सानेगुरुजी परळला कामगार मैदानावर उभे राहयचे. मला तो प्रसंग अजूनही आठवतो आहे. आम्हाला दर्शन असे झालेय सानेगुरुजींचे. मुलांना प्रेमाने जवळ घेणारे.त्या कामगार मैदानावरती भाषणबंदीचा हुकुम बजावला सानेगुरुजींच्यावर. भाषणबंदीचा हुकूम बजावल्यानंतर तो हुकूम हातात घेऊनच सानेगुरुजी स्टेजवर चढलेत अन् तुम्हाला खरोखर सांगतो की, एखादे चंदनाचे झाड जळाल्यानंतर कसे व्हावे? आगही दिसेल आणि सुगंधही आपल्याला येईल अशा प्रकारची त्याची ती वृत्ती पहिल्यानंतर,उभे राहिले नि म्हणाले, 'भाषणबंदी, आमच्या देशातले हजारो लोक फासावर गेलेत, तुरुंगात गेलेत, जन्मठेपेवर गेलेत आणि जो मूलभूत हक्क मिळावा, आम्हाला मुक्तपणाने बोलण्याचा त्यासाठी आम्ही झगडलो-तो आमचा हक्क स्वातंत्र्यात हिरावून घेणारा हा हूकूम आहे.' आणि त्यादिवशी त्यांनी भाषण केले. स्वातंत्र्य म्हणजे काय आणि या जगात त्यासाठी कोणी कुठे काय काय हालअपेष्टा सहन केल्यात यासंबंधी अप्रतिम तेजस्वी निरुपण केले. असे वाटले की, काल गच्चीवर लहान मुलांना गोष्टी सांगणारे सानेगुरुजी, ते हेच सानेगुरुजी आहेत काय ? आणि असे करताकरता शेवटी मी जरा नाटकाचा मनुष्य असल्यामुळे शेवटीचा नाट्यमय

घटनाही माझ्या लक्षात राहिली. त्यांनी असे केले की, असले जे हुकूम येतात याची आम्ही काय पर्वा करतो, ते मी आपल्याला दाखवतो म्हणुन त्यांनी टर्रकन् स्टेजवरतीचा तो हुकूम फाडला. त्यानंतर त्यांना पकडायला आलेला जो पोलिस अधिकारी होता त्यालाही कर्तव्यपालन करणे इष्टच होत. तो- तुम्हाला खरेच सांगतो, 'आयुष्यतले महत् पाप मी करतो आहे.' अशा चेहऱ्याने गुरुजींना म्हणाला, 'मला तुम्हाला या गाडीत बसवून नेले पाहिजे.' गुरुजी ताबडतोब त्यांच्या मागे जाऊन शांतपणाने त्याच्या गाडीत बसले. त्याच्यावर मुळीच रागावले नाहीत. असे रागावणे हे मुळी त्यांच्या स्वभावातच नव्हते. आपल्याला माहित असेल की,बेचाळीसच्या चळवळीमध्ये त्यांना एकदा पळवून न्यायच्या इराद्याने ससून हॉस्पिटलमध्ये आजारी म्हणुन आणले होते. त्यांना तेथून मग निसटायचे होते. तब्येत बरी नाही या बहाण्याखाली तिथे त्यांना आणून ठेवले. अन् चौथ्या पाचव्या दिवशी ते लोक आले नि म्हणाले, 'गुरुजी, आता निसटायचे.' 'नकोरे बाबा' ते म्हणाले म्हणजे त्याचे काय झाले आहे, माझ्यावर जो पहाऱ्याला हवालदार नेमला आहे ना याची नि माझी चार दिवसात ओळख झाली आहे. त्याची लहान लहान मुले आहेत. मी जर पळालो तर त्यांच्या नोकरीवर गदा येईल.' कटबीट खलास! कुठला क ट ? त्या हवालदार अन् त्या मुलांसाठी त्यांचे अंत:करण रडत होते. त्यासाठी ते तुरुंगातल्या हालअपेष्टा सहन करायला तयार झाले. मला तुम्ही सांगा, असले अश्रू आपल्या डोळ्यांतून येण्याचे भाग्य तुमच्या माझ्यापैकी किती जणांना लाभले आहे? हास्य फुटण्याचे भाग्य लाभते, सानेगुरुजी काय स्वत:च्या मुलीचे लग्न होत नाही म्हणुन वैतागले होते का? सानेगुरुजी आपल्याला वरची बढती मिळत नाही म्हणुन चिडले होते की सानेगुरुजी आपल्याला अजून पद्मभूषण केले नाही या चिंतेत होते काय ? ते कसल्याही चिंतेत नव्हते. त्यांना एकच कळत होते की हा देश,जोपर्यंत या देशातील लहान मूल आनंदी दिसत नाही, तोपर्यंत हा देश अभागीच राहाणार. म्हणून सानेगुरुजींनी आपले लक्ष एखादया निष्णात माणसाप्रमाणे योग्य जागी ठेवले. त्यांनी या देशातल्या सगळ्यात महत्वाचा बिंदू काय मानला होता ? तर सानेगुरुजींनी लहान मूल ही देशाचा बिंदू मानला. उपाशी मूल हे पाप मानले. म्हणून त्यांनी एक मोठा मंत्र आपल्याला सांगितला, 'करी मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभुशी तयाचे ।। त्यांनी पूजा कोणाची केली? तर लहान मुलांची केली आणि लहान मुलांना आनंदित ठेवणे हे कर्मकठोर असे काम आहे. लहान मुले सर्वांनाच आवडतात.ती जोपर्यंत हसत असतात, नाचत असतात. तोपर्यंत सर्वांनाच आवडतात. पण रडणारे मूल फक्त आईचेच असते. रडणाऱ्या मुलाला आईशिवाय कोणी जवळ घेत नाही. सानेगुरुजी हे जीवनभर असे आई होऊ राहिले आणि 'आई' यासारखी पदवी दुसरी कुठलीही नाही. मी तुम्हाला सांगतो, आम्ही विठ्ठलाशी ज्यावेळी अगदी सलगी करतो-पंढरपूरच्या त्यावेळी त्याला विठाई म्हणतो. त्याला आपण विठ्ठलराव साहेब वगैरे असे काही म्हणत नाही! विठ्ठलरावजी साहेब- हल्लीच्या राजकीय पध्दतीच्या प्रमाणे त्या 'राव' ला आणखी एक 'जी' जोडावा लागतो तो विठ्ठल म्हणजे विठाई माऊली. 'माऊली.' ही सर्वात मोठी पदवीही आम्ही मानतो. ज्ञानेश्वराबद्दल जेव्हा आम्हाला म्हणायचे तेव्हा आम्ही ज्ञानोबा माऊली म्हणतो. ज्या मुलाचे नांव ज्ञानेश्वर असते, तिथे आमच्याकडे सातारा, सांगली जिल्ह्यामध्ये व पंढरपूरला त्याला ज्ञानेश्वर अशी हाक मारत नाहीत. त्याला 'माऊली' अशी हाक मारतात म्हणजे तो पुरुष असतो पण त्याला

हाक मारतात 'माऊली' अशीच! कारण ज्ञानेश्वर म्हणजे 'माऊली' हे विशेषण वापरले.पण माऊली होणे ही गोष्ट काही तितकी सोपी नाही. मुलांना जन्म देते ती माऊली असे असे मला वाटत नाही. मुलांना जन्म देणे ही निसर्गाने घडविलेली प्रक्रिया आहे. त्यात बाईचे कर्तुत्व आहे असे वाटत नाही. परंतू जी बाई आपल्या जीवनाचे सारे सार हे रोपटं वाढवणे असे मानते. असे मानते, तेथे अहंपण पक्व फळाप्रमाणे गळलेले असते. आपल्या आईचे सर्वांत सुंदर दर्शन आपल्याला कुठे होते ? आपण थोडे दुष्ट असतो तरी ते कुठे होते ते सांगतो आपल्याला मोठ्या हौसेने तिने स्वयंपाक केलेला असतो आणि आपण नंतर आई जेवायची आहे, हे विसरुन सगळे संपवलेले असते आणि ज्यावेळी आई नुसत्या लोणच्याबरोबर भात खाते, त्यावेळी जर आईला म्हटले की, आई अग तुला काही राहिलेले नाही तर ती म्हणते, 'अरे, तुम्ही बाबांनो एवढे जेवलात तेव्हाच पोट भरले माझे.' हे जिचे होते तीच आई ! मुलाला जपणे याचा अर्थ वेडे वाकडे लाड करणे एवढेच नव्हे! नवऱ्याला जपणे किंवा पतिदेव मानणे म्हणजे कसेही चालवून घेणे असा अर्थ नव्हे, तर या भुमिकांमध्ये यायला तुम्हाला काही तरी द्यावे लागते. सानेगुरुजींनी आई होऊन हे दिले. तुम्हाला ठाऊक असेल की जगातल्या कुठल्याही क्रांतीकारकांच्या इतिहासात तुम्हाला असे आढळणार नाही, की क्रांतिकारक म्हणुन जमलेली पोरे, ती गावाहून जाऊन आल्यानंतर भुकलेली असतील म्हणून त्यांना कुणी करुन वाढले पण सानेगुरुजी स्वत: पोळ्या तयार करुन त्यांना वाढत असत.ही आई याला 'आई' म्हणायचे!

आई, पत्नी सौभाग्यवती वगैरे शब्द इतके सहज आणि चुकीचे आज आपण वापरतो की,लग्न झाले की ती त्यांची बायको होते. या गोष्टीवरती माझा विश्वास नाही. ती त्याची बायको म्हणुन व तो नवरा म्हणुन एकमेकांची कर्तव्ये काय हा प्रश्न आहे. नवऱ्याने पाचशे रुपयत पगार असताना पांच हजार रुपयांचा जर हिऱ्याचा दागिना आणला,तर हे पांच हजार रुपये तुमच्याकडे कोठून आले ते आधी सांगा, तरच हे हिऱ्याचे दागिने मी घालीन असे म्हणणारी जी बायको, ती बायको ! नाहीतर हिऱ्याचे दागिने घालते आणि कधी एकदा शेजारणीला जाऊन गळा दाखवते, असे जिला झाले ती बाई पत्नी नव्हे, ती मादी आहे. ती स्त्री नाही. पुरुषाला जर मोठे व्हायचे असेल ,तर त्याला नवरा व्हावे लागेल, त्याने नुसते नर होऊन चालणार नाही.मी तर नेहमी म्हणतो की,जर बाई हातात जळके लाकूड घेऊन उभी असेल, अन् नवऱ्याला म्हणेल, हारामखोर! अगोदर ही नोटांची चवड कुठून आणलीस सांग! नाहीतर माझे कुंकू एका हाताने पुसून दुसऱ्या हाताने तुला पेटवते मी! असे करणारी बाई निघाली, तर या देशात तुम्हाला अनाचार ऐकू येणार नाही. कारण सगळे लबाड नवरे म्हणतात, 'आम्ही काय करणार! आमच्या वाईफला ते पाहिजे होते.' तुमच्या वाईफला दुसरा हसबंड पाहिजे असता तर आणून दिला असता का? बायकांच्यावर सगळ्यात मोठा अन्याय जर कुठे होत असेल तर तो इथे होतो. बायकांसाठी म्हणून नवरे पैसे खातात ही जी समजूत होती, तिथे मातृत्व आणि पितृत्व हे शब्दच मुळी चुकीचे व्हायला लागतात. सानेगुरुजींनी या शब्दांचा खरा अर्थ काय,मातृत्व या शब्दाचा खरा अर्थ काय,हे दाखवून दिले. वेड्या वाकड्या कुठल्याही मार्गाने का होईना माझ्या मुलाला तेवढा मोठा करा म्हणणे मातृत्व नव्हे. परंतु माझा मुलगा असेल,पण त्याच्यापेक्षा स्वयंपाकिणीचा मुलगा,त्याचा पहिला नंबर आला असेल, तर त्याचे कसे होईल? यांची चिंता जिच्या डोळयामध्ये आहे. ती खरी माता.

(चेतश्री प्रकाशन, अमळनेर यांच्या उमाळा या पुस्तकातून साभार)

ऑनलाईन ऑफलाईन

# नवी विटी नवे राज्य...

पारंपारिक दोन सत्रात वर्गात दरवर्षी विद्यार्थी जे शिकतो त्यापैकी किती उपयोगाचे असते, अन किती व्यवहारात निरर्थक असते,हे आपण जाणतोच. लाखो, करोडो रुपये खर्चून घेतलेल्या परीक्षा, खरेच कोणती कसोटी तपासतात, कुणाचे कसले काय मूल्यमापन करतात हेही आपण जाणतोच!मग या असल्या सदोष पद्धतीं ना बदलण्याची, रामराम करण्याची वेळ आलीच आहे तर ती सुवर्णसंधीच समजली पाहिजे करोना कृपेने!



**विजय पांढरीपांडे**
हैदराबाद
७६५९०८४५५५

एकूणच शिक्षणाचे काय करायचे, कसे करायचे हया वर्षी सर्वांना भेडसावणारा ज्वलंत प्रश्न आहे.

अगदी शालेय शिक्षणा पासून ते उच्च शिक्षणापर्यंत, अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन अशा सर्व क्षेत्रात सर्वांगानी, सर्वमान्य, अन सुयोग्य निर्णय घेणे हे खरेच शिवधनुष्य पेलण्यासारखे महा कठीण काम आहे.

करोनामुळे उदभवलेली परिस्थितीच इतकी अकल्पित, विचित्र, अभूतपूर्व आहे की कुठलाही निर्णय घेताना फार मोठी रिस्क आहे. एकीकडे सार्वजनिक आरोग्याचा व्यापक प्रश्न आहे. तर दुसरीकडे मुलांचे भवितव्य,करीयरचे गुणवत्तची मानकेसांभाळून अध्यापन,मूल्यमापन करण्याचे प्रश्न आहेत.याप्रश्नाची,सर्वांसाठी,सर्वांचे समाधान करणारी यनिक,एकमेव अशी उत्तरे नाहीत.एक सांभाळायचे तर दुसरे काही गमवावे लागेल अशी परिस्थिती आहे.

यात टॉप प्रायोरिटीवर प्रश्न आहे तो असार्वजनिक आरोग्याचा.इथे कसलीही तडजोड चालणार नाही. इथे केवळ तुमचा आमचा विचार महत्वाचा नाही. विषाणूची भयाण संसर्ग जन्य क्षमता लक्षात घेता एकूणच राज्याच्या, देशाच्या नव्हे तर जगाच्या आरोग्याचा प्रश्न आहे. एकदा हे मान्य केले तर इतर सर्वच क्षेत्रात कुठेना कुठे, कमी अधिक प्रमाणात तडजोड करणे अनिवार्य आहे.

गेल्या काही महिन्यात हो नाही करता करता, सरकारच्या, युजीसीच्या दडपणामुळे म्हणा, आग्रहा मुळे म्हणा,वेगवेगळ्या स्तरावर, वेगवेगळ्या पद्धतीने ऑनलाइन, ऑफलाईन परीक्षा घेण्यात आल्या. त्या परीक्षांच्या निकालाच्या विश्वासार्हतेवर आता शंका निर्माण करणाऱ्या बातम्या येताहेत. कारण ज्या विद्यार्थ्यांना ४० -५० टक्के गुण मिळायचे, त्यापैकी अनेकांना शंभर टक्के गुण मिळालेत म्हणे! निकालाची टक्केवारी देखील कितीतरी पटीने

वाढलेली! पर्यायाची प्रश्नपत्रिका असल्याने असे निकाल लागल असावेत! शिवाय विद्यार्थ्यांवर परीक्षेच्या वेळी पर्यवेक्षकाचे ऑफलाईन नियंत्रण(म्हणजे पूर्ण दुर्लक्ष) हेही कारण असू शकते. काही ठिकाणी तर प्रश्नपत्रिका आधी दिल्या ,किंवा मोजके प्रश्न सांगून टाकले, भरपुर चॉईस, अभ्यासक्रमात कपात,तपासण्यात ढिलाई,ही देखील कारणे असू शकतात.

एकूणच कसे तरी शिकवायचे, कसे तरी अभ्यासक्रम पूर्ण करायचे, कशातरी परीक्षा घ्यायच्या, कसेतरी निकाल लावून विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात ढकलायचे, असा कसातरी पॅटर्न सगळीकडे चालूआहे.ठाम निर्णय घेण्याची स्थानिक प्रशासनाची,अधिकाऱ्याची,शैक्षणिक प्राधिकरणची,शाळा कॉलेज प्रमुखाची, मंत्र्याची, सरकारची,कुणाचीच इच्छा नाही.प्रत्येक जणनिर्णय घ्यायला घाबरतो आहे सध्या.कारण कोणताही निर्णय घेतला तरी तो चुकण्याची, कुणावर तरी अन्याय होण्याची, कुणीतरी टीका करण्याची,कुठे तरी तडजोड केल्याची शक्यता, रिस्क जास्त आहे.त्यामुळे जो तो निर्णय घेण्याचे टाळतो आहे.

शाळा कॉलेजात,विद्यापीठात ऑनलाईन शिक्षण सुरू असल्याचे सांगितले जाते.पण त्यात किती अडचणी आहेत, ते किती परिणामकारक आहे,त्यात सर्वसमावेशकता आहे का, सर्वांना सर्वसोयी( इंटरनेट, लॅपटॉप,स्मार्टफोन, प्रिंटर) उपलब्ध आहेत का?गरीबांना खेड्यापाड्यात जिथे वीज अन शुद्ध पाणीदेखील उपलब्ध नाही,तिथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत, या ऑनलाईन सुविधा कशा पोहोचणार? शिवाय विज्ञान तंत्रज्ञान अन समकक्ष अभ्यासक्रमात आवश्यक असणारी प्रात्यक्षिके,प्रोजेक्ट्स हे कसे करणार? त्यासाठी आवश्यक उपकरणे, मापके कुठून आणणार? आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून बऱ्याच गोष्टी शक्य आहेत.पण त्यासाठी लागणारा पैसा, मनोवृत्ती, तयारी कुठे आहे? एकूणच पूर्वीसारखी, जैसेथे परिस्थिती निर्माण करणे हे सद्यस्थितीत अशक्यप्राय आहे.

मग करायचे काय? ह्या एकूणच अभूतपूर्व आपत्कालीन संकटाचा सामना करायचा कसा?

पहिली गोष्ट म्हणजे हे संकट अभूतपूर्व आहे,ते स्थानिक म्हणजे फक्त आपल्या पुरते मर्यादित नसून,जागतिक आहे हे स्वीकारणे. जे काही तोटे, नुकसान होणार, ते केवळ तुमच्या पुरते मर्यादित नाही, तर ते जागतिक, सर्वव्यापी आहे हे मान्य करा. जेव्हा समस्या अभूतपूर्व असते तेव्हा तिथे समाधान, त्या प्रश्नाची उत्तरे देखील आगळी वेगळी असणार. नेहमी सारखी नसणार.शिवाय एकच उत्तर सर्व भागात, सर्व राज्यात,देशात,जगात लागू नसणार. सगळे निर्णय हे त्या त्या भौगोलिक, आर्थिक, सामाजिक,सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबून असणार. प्रत्येकाचे सोल्युशन वेगळे असणार. त्यामुळे एकच पर्याय,एकच निर्णय,एकच पद्धत असा समभावाचा आग्रह आपल्याला सोडावा लागेल.दोन विद्यापीठाचे,दोन राज्यांचे, दोन देशाचे निर्णय हे वेगवेगळे असू शकतील. शिवाय शहरी ग्रामीण असेही भेद राहतीलच.आता एकुणच शिक्षणक्षेत्राकडे बघण्याचा दृष्टीकोन आपल्याला मुळापासून बदलावा लागेल.ह्या भूमिकेतून पाहिले तर सद्य परिस्थितीकडे संकट म्हणून न बघता सुवर्णसंधी म्हणून देखील बघता येईल. हा आशावादी, पॉझिटिव्ह विचार पुढे जाण्यासाठी मग उपकारकच ठरेल.एखादा विद्यार्थी अपंग असेल तर त्याला परीक्षेत मदतनीस देतात. अंध बधिर विद्यार्थ्यांना वेगळ्या सुविधा दिल्या जातात. वेगळे पर्याय असतात.या परिस्थितीत

आपल्यापैकी प्रत्येकाला कसले तरी अपंगत्व आले आहे असे समजू हवेतर. हे विधान पचवायला जरा कठीण वाटेल. पण परिस्थितीच तशी असल्याने आपल्याला हे कडवट डोज पचवावेच लागतील. दुसरा पर्याय नाही. म्हणता म्हणता थोडाथोडका नाही, वर्षभराचा काळ लोटला आहे. हे असेच किती काळ चालेल हेही कुणाला माहिती नाही.लस आली की प्रश्न सुटतील असे म्हणणे सोपे. पण तेही तितके खरे नाही. नवेवेगळे प्रश्न निर्माण होतील.या परिस्थितीने झालेले नुकसान, झालेल्या शारीरिक जखमा,निर्माण झालेले मानसिक ताण,आर्थिक पांगळेपण, हे सगळे इतके विचित्र, अभूतपूर्व आहे की परिस्थिती मूळ पदावर यायला बराच काळ जावा लागेल. या परिस्थितीने शिक्षण,पदवी,नोकरी,व्यवसाय,लग्न,संसार,नातीगोती, यासर्व संकल्पनाच्या, भावभावनाच्या व्याख्याच बदललेल्या आहेत. आणखीन काय काय बदल स्वीकारावे लागतील हेही अनिश्चित आहे. हे सर्व बदल आपल्याला गुण्यागोविंदाने स्वीकारावे लागतील. इथे कुणालाच चॉईस नाही.लहानमोठे, गरीब श्रीमंत,स्त्री पुरुष,दुबळे बलवान, सर्वांनाच परिस्थितीच्या गामभीर्याचा स्वीकात करीत पुढचे पाऊल तितक्याच सावधगिरीने पुढे रेटावे लागेल. कुठल्याच बाबती तरि जिड, आग्रही राहून चालणार नाही. सगळीकडे लवचिक धोरण स्वीकारावे लागेल.झुकते माप घ्यावे लागेल.गुणवत्तेशी तडजोडन करता देखील काही मापके ,नियम बदलता येतील. अभ्यासक्रमाची काटछाट म्हणजे कमी शिकणे असेन समजता नवे,वेगळे,वेगळ्या पद्धतीने शिकणे असाही अर्थ घेतला जाऊ शकतो.तसे ही पारंपारिक दोन सत्रात वर्गात दरवर्षी विद्यार्थी जे शिकतो त्यापैकी किती उपयोगाचे असते, अन किती व्यवहारात निरर्थक असते,हे आपण जाणतोच. लाखो, करोडो रुपये खर्चून घेतलेल्या परीक्षा, खरेच कोणती कसोटी तपासतात, कुणाचे कसले काय मूल्यमापन करतात हेही आपण जाणतोच!मग या असल्या सदोष पद्धतीं ना बदलण्याची, रामराम करण्याची वेळ आलीच आहे तर ती सुवर्णसंधीच समजली पाहिजे करोना कृपेने!

आता सगळी जबाबदारी शाळा कॉलेज प्रमुखावर,अधिकारीमंत्र्यावर,सरकारवर टाकून चालणार नाही. विद्यार्थी, पालक,उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, सर्वाचाच सहभाग या नव्या संक्रमण प्रक्रियेत तितकाच महत्त्वाचा,गरजेचा आहे.विद्यार्थ्यांनी देखील परावलंबी न राहता आपली जबाबदारी स्वीकारली, समजली पाहिजे. पालकांनी, शिक्षकांनी त्यांना ती समजावून दिली पाहिजे.अनेक गोष्टी स्वयंशासन, स्वावलंबन, पद्धतीने, सहकार्यानं शिका येतील.सर्वच बाबतीत आता शाळा कॉलेज,प्राध्यापकावर अवलंबून राहून चालणार नाही. शिक्षणाकडे व्यापार म्हणून बघी शिक्षणसम्राटांनी (खाजगी कॉलेजेस, शिकवणी क्लासेस,आटोनोमस, स्वायत्त विद्यापीठे यांचे संचालक) सोडले पाहिजे. प्रत्येकाने समाजभान स्वीकारले पाहिजे.ह्या काळात एकमेका सहाय्य करू,अवघे धरू सुपंथ,असा सामंजस्याचा दृष्टीकोन सर्वांनी अंगिकारला तर हेही दिवस जातील. आपण नवी विटी नवे राज्य निर्माण करू,जे आजच्यापेक्षा सशक्त, सुरस, सुखद, असेल.


आनंदाचं झाड

# शिक्षक एक जागल्या !



**युवराज माने**
सेलू, जि.परभणी
७५१७४७८५७०

एका ठिकाणी शिक्षकांविषयी लिहिताना प्राचार्य नरहर कुरुंदकरांनी शिक्षकांचे दोन प्रकार सांगितले आहेत वर्गातले शिक्षक- ते केवळ वर्गापुरता विचार करतात, चौकटीतलं काम ते उत्तम प्रकारे करतात. हेही काम महत्त्वाचं आहे. या शिक्षकांचेही महत्व कुणीही नाकारू शकत नाही.त्यांनी दुसरा प्रकार सांगितला 'समाजाचे शिक्षक'- अशा प्रकारचे शिक्षक वर्गात मावतच नाहीत. समाज घडवण्याचे मोठे काम ते सातत्याने करत असतात.वर्ग हाही समाजाचं एक छोटे रूप आहे.



आमच्या आनंदाच्या बियांना आता उत्तम सूर गवसला होता.त्यांना प्रकाशाची धुमारे फुटू लागले होते. सोबतच पुस्तकातील मोठी माणसं दररोज लेकरांच्या भेटीला येऊ लागले होते.पुस्तकाच्या रूपाने जगाकडे पाहण्याची एक खिडकीच त्यांच्यासाठी खुली झाली होती.शाळेपासून दूर पळणारी मुलं वेगवेगळ्या उपक्रमांच्या व पुस्तकांच्या माध्यमातून शाळेत येऊ लागली.पूर्ण अंधारापेक्षा प्रकाशाची एक तिरीप का होईना आम्हाला मोलाची वाटू लागली.

वर्गातलं वातावरण आणि घरातलं वातावरण यात जर प्रचंड तफावत असेल तर मुलांचा जो अपेक्षित विकास आहे तो साधणं अवघड होऊन जातं.मुलांनी बोलणं,त्यांनी त्यांच्या अपेक्षा व्यक्त करणं वाटतं तेवढं सोपं नाही.यासाठी संपूर्णपणे भयमुक्त वातावरणाची गरज आहे.आपण नि:संकोचपणे आपल्याला काय वाटतं ते सांगू शकतो हे मुलाला जाणवलं पाहिजे. यासाठी आम्हा

सर्व गुरुजींची प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू होती.शिक्षण हे वर्गाच्या चार भिंतीतच देता येतं हा आमचा गैरसमज कधीच गळून पडला.कारण मुलांच्या कृतीला वाव दिल्याशिवाय आमची मुलं शाळेत टिकुच शकत नव्हती. गुरंढोरं, शेळ्यामेंढ्याच्या मागे फिरणं. डोंगरदऱ्यात, झाडाझुडुपात मनसोक्त हुंदडणं यामुळे शाळेच्या चार भिंतीत त्यांना घुसमटल्यासारखं वाटायचं.मुलांचा विश्वास मिळवणे म्हणजे दिलेला शब्द पाळणे,त्यांचा खाजगीपणा जपणे.हे आम्ही सर्व शिक्षक चांगल्या पद्धतीने समजू लागलो होतो.शिक्षण नेमकं कशासाठी? हे जाणून घेणं जसं महत्त्वाचं आहे तसंच हे शिक्षण ज्यांच्यापर्यंत पोहोचवायचं आहे त्या मुलांना जाणून घेणंही महत्त्वाचं आहे.हे शिक्षणातील त्रिकालाबाधित सत्य आहे जे आम्हा सर्व गुरुजींना कळून चुकलं होतं.

आपल्या जीवनात येणारा प्रत्येक माणूस आपल्याला नवीन काहीतरी शिकवून जातो हे अगदी सत्य आहे.उपक्रमांच्या माध्यमातून शाळेत अनेक व्यक्तिमत्वांची हजेरी लागू लागली.असंच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे आसाराम लोमटे! परभणीचे भूमिपुत्र ज्यांच्या लेखणीतुन वास्तव वाचकांच्या मनाला भिडतं.मनीषा राठोड या चिमुकलीचे ते 'पेनमित्र' होते.या माध्यमातून ते आनंदाच्या झाडात सहभागी झाले होते.मागील आठवड्यातच त्यांचा 'आलोक' कथासंग्रह मुलांना वाचून दाखवला.त्यातील कथांनी आमच्या वास्तव जीवनाला स्पर्श केला होता. मुलांच्या मनात त्यातील कथा अजूनही रेंगाळत होत्या. मनीषा,राधा,काजल व अजय यांनी पुस्तकाचं छानसं पुस्तक परीक्षण केलं होतं.आसाराम लोमटे यांच्या आलोक कथासंग्रहास 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार प्राप्त झाला आहे ही बातमी मुलांना देताचं मुलांना खूप आनंद वाटला.पुढे काही दिवसांनी सेलू येथे त्यांचा भव्य नागरी सत्कार ठेवण्यात आला.आपल्याच मातीतील व मुलांच्या परिचयाचा लेखक म्हणून त्यांना मिळालेल्या पुरस्काराचं आम्हा सर्वांना खूप अप्रूप वाटू लागलं.सेलू शहरातून आसाराम लोमटे यांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार होती.एका शेतकऱ्याच्या मुलाने साहित्य क्षेत्रात सिद्धहस्त प्राप्त करणं व त्याचा इतका मोठा भव्य सत्कार होणार हे माझ्यासाठी व माझ्या मुलांसाठी एक प्रेरणादायी गोष्ट होती.शाळेतील काही लेकरांसमवेत कार्यक्रमाला आम्ही उपस्थित झालो.कार्यक्रमातील आसाराम लोमटे यांची भव्य मिरवणूक,त्यांच्या आई-वडिलांचा भव्य नागरी सत्कार, कार्यक्रम स्थळी असलेला भव्य जनसमुदाय अशा अनेक बाबी लेकरांनी डोळ्यात साठवून ठेवल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले दुसरे सिद्धहस्त साहित्यिक 'राजन गवस'यांचा अध्यक्षीय समारोप सुरू झाला.या शब्दप्रभूच्या मुखातून निघणारा प्रत्येक शब्द हृदयाच्या कोपऱ्यात जपून ठेवावा असंच वाटू लागलं.त्यांच्या साहित्य प्रवासातील अनेक वास्तव आठवणी त्यांनी या प्रसंगी विशद केल्या. आसाराम लोमटे या शेतकऱ्याच्या मुलाने साहित्य क्षेत्राशी जोडलेली नाळ व वास्तवरुपी केलेलं लेखन माणसाला सामाजिक भान दर्शवणारं आहे. असे ते म्हणाले पुढे बोलतांना त्यांनी आसाराम लोमटे यांना उद्देशून बोललेल्या काही ओळी एक शिक्षक म्हणून माझ्या मनात प्रचंड ऊर्जा निर्माण करणाऱ्या व सोबत मला चिंतन करण्यास भाग पाडणाऱ्या होत्या.आसाराम, ही भव्य मिरवणूक, हा नागरी सत्कार व साहित्य अकादमीने तुमच्या डोक्यावर जो मुकुट घातला आहे तो पहाणाऱ्यास प्रेरणा देणारा

तर आहेच याशिवाय तुमच्यासाठी हा मुकूट म्हणजे समाजासाठी तुम्ही एक उत्तम 'जागल्या' आहात याचे निर्देशक आहे.यापुढेही समाजातील प्रत्येक घडणाऱ्या घटनेची वास्तव मांडणी करून समाजविघातक कृत्य होणार नाहीत याविषयी सतत जागं राहावं लागेल.'जागल्या' म्हणून तुमची भूमिका तुम्हाला रात्रंदिवस पार पाडावी लागेल. राजन गवस यांचं हे बोलणं कार्यक्रमात उपस्थित असलेल्या प्रत्येक माणसाच्या हृदयास भिडलं होतं.समाजासाठी जागल्याची भूमिका पार पाडणारे अनेक घटक त्या ठिकाणी उपस्थित होते त्यात प्रामुख्याने मी एक शिक्षक म्हणून समाजासाठी किती महत्त्वपूर्ण आहे याची जाणीव त्या क्षणी मला झाली.

एका साहित्यिकाप्रमाणेच शिक्षकही समाजासाठी एक 'जागल्या'आहे.याचे चिंतन मी करू लागलो.शिक्षकांसमोर रसरशीत व्यक्तिमत्वाची नवी पिढी असते.त्यांचे तरल चेहरे त्यांचे जीवनाकडे उत्सुकतेने आणि उत्साहाने बघणारे डोळे शिक्षकांना सतत आव्हान करत असतात.ते उजळले की त्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघण्याचं भाग्यही शिक्षकांच्या नशिबात असतं हेही शिक्षकांनी जाणलं पाहिजे.आज वातावरण असं आहे की,जे फक्त धावणं नि धावणंचं शिकवतं.नुसतं धावत राहा, धावत राहा एवढं सांगत राहणं म्हणजे शिक्षकपण होय का? एक जागल्या म्हणून विद्यार्थ्यांची धावण्याची दिशा तरी निश्चित करून दिली पाहिजे.आपल्या पुढील पिढीच्या आनंदाची पूर्वतयारी फक्त त्यांना आर्थिक चिंतेतून मुक्त करण्यातून न करता त्यांचं जगणं समग्रतेने त्यांनी जगावं यासाठी त्यांना सबळ-सक्षम करायला हव.एके ठिकाणी प्रवीण दवणे अतिशय मार्मिकपणे सांगतात, साधा नारळ विकत घ्यायचा असला तरी आपण - पाणी आहे की नुसताच गोटा - ते हलवून बघतो,मग आयुष्यात स्वतःला कुठे जायचंय - काय व्हायचंय?- याचा निर्णय थोड्या धीराने घ्यायला हवा- झाडाला लवकर फुले यायला हवं म्हणून मुळाशी रसायने घातलं की - येणारं फुल - त्यानंतर फळ - लवकर येईल कदाचित- पण ते निरामय,जीवनसत्वयुक्त असेल का?-झाडाप्रमाणेच - नव्या पिढीची वाढही 'नैसर्गिक' च हवी, फक्त योग्य निगराणी - हेच आपलं शिक्षक म्हणून काम!

शेतकरी ज्याप्रमाणे शेतीत पेरणी केल्यापासून ते पीक निघेपर्यंत शेतीचे संरक्षण करत असतो.पीक काढणीला आल्यानंतर त्याला अत्यंत सतर्क राहावं लागतं.अशी भूमिका एक शिक्षक म्हणून शिक्षणाच्या क्षेत्रातही आपली असायला हवी. शिक्षक या पदाची व्याप्ती आणि खोली जाणणारे शिक्षक असणं खूप गरजेचे आहे.केवळ वर्गापुरता पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम पूर्ण करणं हे केवळ एक नैमित्तिक काम झालं;पण ते करत असताना नव्या पिढीच्या जाणिवा विकसित करणं व त्या विकसित करता करता स्वतःच्याही जाणिवा समृद्ध करण्याची प्रक्रिया जो शिक्षक करतो तो 'जागल्या'ची उत्तम भूमिका करतो. या पिकाला कुठल्याही प्रकारची बाधा निर्माण होऊ नये यासाठी सातत्याने काम करतात.अशा प्रकारचे शिक्षक 'जागल्या' ची भूमिका उत्तम पणे पार पाडतात.

वर्ग पहिलीत आपल्या मुलाला शाळेत प्रवेश करताना पालक माझ्यासारख्या शिक्षकावर किती मोठा विश्वास टाकतात.तो विश्वास सार्थकी लावणं हे माझं प्रथम कर्तव्य आहे. शिक्षक शिक्षणाचं महत्व जाणून असतो. पालकांपेक्षा तो जागृत असतो.पालक मुलाला शाळेत पाठवल्यानंतर गुरुजीच माझ्या लेकराचा

भाग्यविधाता आहे.हा पालकांचा विश्वास मला सतत जागं ठेवतो.शाळेत आल्यानंतर प्रत्येक मूल शिक्षकाचं स्वतःचं असतं.मुलाविषयी चांगलं-वाईट याची जाणीव त्याला असायलाच हवी. घरात, वर्गात मुलांच्या रूपांत शिक्षकाला भविष्यातल्या सुंदर शक्यता दिसायलाच हव्यात; ज्यात उद्याची कवी ,संगीतकार, संशोधक,डॉक्टर वा कदाचित उद्याचे ज्ञानपीठ स्वीकरणारे हात माझ्याच वर्गात असू शकतात हे नाकारता येणार नाही. वास्तविक शिक्षणाने मुले विचारी व सर्जनशील व्हावेत. विचार,मते,भावना,कल्पना मांडायला शिकावीत ;त्यांना विविध प्रकारच्या लेखनाचा आस्वाद घेता यावा;हे साध्य करण्यासाठी शिक्षकांनी पाठाबाहेर जायला हवे.ही स्वतःच्या अनुभवातून आलेली शिक्षणाविषयीची माझी स्वतःची अनुभूती.

शिक्षकांच्या भूमिकेविषयी बोलताना प्रवीण दवणे एका ठिकाणी म्हणतात,प्रतिभा ही ईश्वरी देणगी आहे, मान्य आहे पण आपल्या व्यवसायावर निरातिशय प्रेम करीत नव्या पिढ्यांना जिव्हाळा देणं; हे तर आपल्या हातात आहे ना! माझी तर अशी श्रद्धा आहे, माऊलीच्या करुणेने तुम्ही वर्गा पुढे नुसते उभे रहा;तुमच्या वाणीला कधी पाझर फुटतील ते तुम्हाला कळणारही नाही.विषय कुठलाही शिकवा आपण तो शिकवताना आनंद घेत आहोत,याचाच मुलांना आनंद होतो आणि त्या आनंदात एखाद्या गणितातूनही संगीत केव्हा झंकारतं ते कळतही नाही.आपल्या वर्गाना स्वाभाविकच भिंती असतात वर छप्पर असतं.मान्य आहे पण शिक्षणाचा आनंद देत असताना या भिंतीचा विस्तार करणारा मजकूर आपल्याकडे हवा.वर्गाच्याच खिडकीतून आकाशाचा निळा तुकडा दाखवणारी आपली शैली हवी;भले कॅलेंडरमध्ये पावसाळा नसेल पण छपरातूनही जलधारांचा वर्षाव होत आहे असा उत्साह देणारा आपला दृष्टिकोन हवा! शिक्षण म्हणजे केवळ काही वर्षांपूर्वी संकलित केलेल्या माहितीचे गाठोडं वर्गाच्या डोक्यावर फेकणे नव्हे;तर त्याचं वर्तमानाशी नातं जोडता यायला हवं.या साऱ्या शिक्षणाला आज जगताना काय महत्त्व आहे ते आजची उदाहरण घेऊन सांगायला हवं.जे कधीही जुनं होत नाही तेच खरं शिक्षण! त्यात भर पडतच राहते. हीच तर ज्ञानाची गंमत आहे,भिंतीपलीकडच्या जगातलं शिक्षकांच अध्यापन जेव्हा चटकन भिंतीपलीकडे जातं तेव्हा ती 'शाळा' न राहता ते गुरुकुल होतं,तिथंच शिक्षकाचा 'गुरु' होतो.

राजन गवस यांच्या 'जागल्या' या भूमिकेविषयीचे चिंतन ऐकून शिक्षकाची समाजातील भूमिका किती महत्त्वपूर्ण आहे किंबहुना शिक्षक समाजाचा किती महत्वपूर्ण 'जागल्या'आहे याची सत्यता पटली. 'जागल्या'च्या भूमिकेतूनच आपल्यासमोरील विद्यार्थ्यांमध्ये संवेदनांची जाणीव निर्माण करणे हे महत्त्वपूर्ण काम आहे.संवेदनाची जाणीव करणं हे फार महत्त्वपूर्ण काम आहे .'माया अँजेलू'या एक अमेरिकन लेखिका, कवयित्री, आणि गायिका आहेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही लोकांना काय म्हणाला होतात हे ते विसरतील, त्यांच्यासाठी तुम्ही काय केले होते तेही लोक विसरतील परंतु त्यांच्यामध्ये तुम्ही जी संवेदना निर्माण केलेली असते ती मात्र लोकं कधीही विसरत नाहीत.शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये ही संवेदना निर्माण होते. त्यामुळेच आपले जीवन बदलते. आपण स्त्री किंवा पुरुष कोणीही असलात तरी ही संवेदना आणि जाणीवच आपल्या चिरकाल स्मरणात राहते.

चला तर मग समाजाचा सर्वोत्तम 'जागल्या' होऊया, आपल्या विद्यार्थ्यांमध्ये संवेदना निर्माण करूया. संवेदना रूपानं जिवंत राहू या.......

समृध्द शिक्षणासाठी

# बुनियादी शिक्षा आणि शिक्षणाची सद्यस्थिती



**पंकज शिंदे**
चोपडा जि.जळगांव
९९७५३६०२३०

ऑनलाईन पद्धतीने नफा-तोटा शिकून घेणारे हे विद्यार्थी बाजारात गेल्यावर भाजीपाला खरेदी करताना मात्र भांबावून गेलेले दिसतात!!! म्हणजे ऑनलाइन पद्धतीने शिकणाऱ्या आजच्या विद्यार्थ्यांना माहिती तर खूप आहे पण प्रत्यक्षात त्याचे उपयोजन करताना अडचणी निर्माण होतात. ऑनलाईन शिक्षणाच्या या धावत्या काळात विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होतो. पण त्याच्या Head सोबत Heart आणि Hands चा देखील विकास करणे गरजेचे आहे.



सत्य ,अहिंसा, शिक्षण, समता अशा विविध मानवी मूल्यांना केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्ष आपल्या जीवनात आचरणात आणण्याचे महान कार्य गांधीजींनी केले. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे विचार त्यांच्या 'बुनियादी शिक्षा' या क्रांतिकारी शिक्षण व्यवस्थेतून समजून येतात.

त्या काळात इंग्रजी शिक्षण व्यवस्थेतून फक्त कारकून तयार करण्याचे शिक्षण शाळांमधून दिले जात होते. पण देशाची तत्कालीन परिस्थिती पाहता देशात स्वावलंबी, आत्मनिर्भर व स्वतःची उपजीविका स्वतः भागवण्यासाठी पुरेसे अर्थार्जन करून देणाऱ्या शिक्षण व्यवस्थेची गरज ओळखली ती फक्त महात्मा गांधीजी यांनीच !

खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणावयाचा असेल तर शिक्षणातून फक्त त्याचा बौद्धिक विकास न साधता त्याचा बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक विकास साधला जावा असा विचार गांधीजींनी मांडला.

## Head, Heart, Hand

या (३H) चा विकास घडवून आणणारे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे हे गांधीजींना अपेक्षित होते. म्हणून नेहमीच्या शिक्षणव्यवस्थेत बदल करीत त्यांनी 'बुनियादी शिक्षा' ही नवीन शिक्षण पद्धती अमलात आणण्याची योजना १९३७ यावर्षी मांडली.

विद्यार्थ्यांना बालपणापासूनच किमान एक

स्वावलंबी उद्योग करता यावा व पुढे त्यातूनच त्याला अर्थार्जन करायला मदत मिळावी या हेतूने सर्व अभ्यासक्रम हा उद्योग व शिक्षणाच्या परस्पर संपर्कावर आधारित असावा असा या शिक्षा पद्धतीचा गाभा होता. या उद्योगात मोठे उद्योग करणे अपेक्षित नसून फक्त चरखा चालवणे, सूतकताई करणे, स्वयंपाक बनवणे, झाडू चालवणे, स्वच्छता करणे, शेती करणे यापैकी कोणताही एक उद्योग निवडता येऊ शकतो. शिवाय इतर विषय देखील याच उद्योगातून शिकवता यावेत. उदाहरणार्थ भूगोल शिकवत असताना सूतकताई या उद्योगाच्या माध्यमातून हे सूत कोणत्या वनस्पती पासून मिळते? कापूस कोणत्या भागात जास्त पिकवला जातो ? त्यासाठी हवामान कसे असावे लागते ? इत्यादी बाबी त्यात जोडता येतील. सूतकताई करत असतानाच गणित शिकवताना सूतकताईतुन किती रुपये मिळतील ? सूतकताई साठी खर्च किती आला ? यातून नफा किती झाला ? अशा विविध प्रश्नांवर प्रकाश टाकून सूतकताई या उद्योगातूनच गणित देखील शिकवता येईल. इतर विषय देखील याच पद्धतीने शिकवावेत. व अशा प्रकारचा उद्योगावर आधारित नवीन अभ्यासक्रम तयार करावा हे गांधीजींना अपेक्षित होते. यातून किमान प्राथमिक शिक्षण पूर्ण झालेला विद्यार्थी पुढे फक्त सुशिक्षित बेरोजगार म्हणून न फिरता तो किमान सूतकताई, शेती, अशा किमान एखाद्या उद्योगात पारंगत झालेला असेल; आणि त्यातून स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची उपजीविका तो भागवू शकतो. म्हणजेच तो स्वावलंबी बनू शकतो. पर्यायाने देशातील बेरोजगारी कमी होऊन भूक बळींची संख्या कमी होऊ शकते आणि देश पुन्हा पूर्वीप्रमाणेच संपन्न बनवू शकतो. हेच या बुनियादी शिक्षेचे गमक होते.

आजची शिक्षण व्यवस्था पाहता विद्यार्थ्यांमध्ये केवळ अधिकाधिक माहिती मिळवून अधिकाधिक गुण प्राप्त करण्याची शर्यत लागलेली दिसून येते. एखाद्या विषयाची माहिती असणे म्हणजेच त्या विषयाचे ज्ञान असते असाच काहींचा गैरसमज झालेला दिसून येतो. ऑनलाईन शिक्षणाच्या या धावत्या काळात विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होतो. पण त्याच्या Head सोबत Heart आणि Hands चा देखील विकास करणे गरजेचे आहे. अन्यथा प्रचंड बौध्दीक पातळी असलेली ही नवी पिढी रस्त्यावर अपघात झालेला पाहून त्या ठिकाणी अपघातग्रस्तांना मदत करण्याऐवजी फक्त फोटो घेणे किंवा समाजमाध्यमांवर संवेदना व्यक्त करणे इतवरच मर्यादित राहील. खूप जास्त गुण मिळवून देखील अपेक्षित नोकरी न मिळाल्यामुळे नैराश्य प्राप्त झालेले तरुण आज देखील समाजात पहावयास मिळतात. पण ह्याच तरुणांनी किमान एखादे उद्योग शिक्षण घेतले तर ते आपल्या बुद्धीच्या जोरावर आणि उद्योग शिक्षणातील क्रियात्मक कौशल्यांच्या आधारे स्वतःचे उद्योग देखील निर्माण करू शकतील. फक्त गरज आहे ती गांधीजींच्या बुनियादी शिक्षा या शिक्षण प्रणालीतील काही मूल्यांची !!!! अर्थात पूर्णपणे बुनियादी शिक्षा स्वीकारणे किंवा सद्यस्थितीची शिक्षणव्यवस्था टाकून देणे हा काही पर्याय ठरू शकत नाही.पण आज ऑनलाइन शिक्षण ही जरी काळाची गरज वाटत असली तरी बुनियादी शिक्षेच्या काही पैलूंना मात्र आपल्याला स्वीकारावे लागेल हे वास्तव देखील आपण विसरू शकत नाहीत.

**(पंकज प्रतापराव शिंदे हे प्रताप विद्या मंदिर, चोपडा जि.जळगांव येथे उपशिक्षक म्हणून कार्यरत आहे.)**

# निसर्ग वादळ

फक्त लढ म्हणा...

गावात प्रवेश करायच्या आधीच शंभो महादेवाच्या डोंगराजवळ आले की, घाटा तूनच त्या सुसज्ज शालेय इमारतीचे दर्शन होते. ते पाहून मन प्रसन्न व्हायचे. या, मी सदैव तुमच्या स्वागतसाठी तयार आहे, अशी जणू सादच घालते ती असे वाटायचे. त्या सुखद क्षणाची वाट पहात असतांनाच ३ जून २०२० रोजी झालेल्या निसर्ग वादळी वाऱ्याने होत्याचे नव्हते करून टाकले. दिमाखात उभी असलेली आमची शाळा उघडी बोडकी केली.



**सुरेखा निकुंभ(ठोके)**
खेड जि.पुणे
९४२२९९५३०६





१३ जून २०१८ रोजी पाळूवरून बदली झाल्याने गुडांळवाडी या ठिकाणी रूजू होण्यासाठी गेले. माझ्या आधी माझ्या सहकारी चार भगिनी २८ मे २०१८ ला रूज झालेल्या. म्हणजे सर्व शिक्षक वर्ग नवीन. गावात कोणाशीही परिचय नाही. पण आम्ही मात्र एकमेकींना ओळखत होतो. पहिले दोन दिवस शाळा पूर्व तयारी झाली. नंतर नेहमीप्रमाणे शाळा सुरू झाली. आठ वर्ग खोल्यांची टुमदार इमारत विद्यार्थी व आम्हा शिक्षकांसाठी सज्ज होती. एक नं खोलीत पहिली आणि तिसरीचा वर्ग, दोन नं.ला दुसरी आणि चौथी, तीन नं. पाचवी, चार नं. खोलीत शाळेचे सर्व जुने साहित्य, पाच नं. कार्यालय, सहा नं. सातवीचा वर्ग, सात नं. गावातील बांधकामाचे व इतर साहित्य, आठ नं अंगणवाडी, माझ्याकडे सहावीचा वर्ग मुलांलाच्या आणि माझ्या मनात प्रश्न चिन्ह. आपण कुठे

बसायचे? मुख्याध्यापकांनी आणि ग्रामस्थांनी सांगितल्याप्रमाणे आमची अध्ययन अध्यापनाची सुरूवात कार्यालयातून झाली. साधारण आठ दिवस कार्यालयात पार पडल्यानंतर मुख्याध्यापक आणि ग्रामस्थांच्या मदतीने गावचे साहित्य ठेवलेली खोली रिकामी करण्यात आली. अध्यक्षांनी भिंतीचे रंगकाम केले. विद्यार्थ्यांच्या मदतीने मी फळे रंगवले. सिमेंट आणून खड्डे बुजवले. आणि सजावट करून स्वतंत्र्यपणे आमच्या नवीन वर्गाची सुरूवात झाली. आमच्या सर्व सहकार्यांची भेट फक्त जेवतांना होत असे. नाहितर दिवसभर ''एकच ध्यास, गुणवत्ता विकास.''आमच्यामध्येच एक प्रकारची स्पर्धा चालू होती. प्रत्येक शिक्षक आपआपल्या कामात मग्न. विद्यार्थीही तेवढ्याच तन्मयतेने कार्यरत होते. कंटाळा आला, मॅंडम आता बस. अस वाक्य तर त्यांच्या तोंडून कधी आलेच नाही. विद्यार्थी, शिक्षक आणि शाळेचा तिसरा घटक म्हणजे पालक व ग्रामस्थ त्यांचे सहकार्य तर वाखाणण्याजोगेच आहे. शाळेचा कुठलाही कार्यक्रम असू द्या, घरातील सणसमारंभ असल्यासारखा सर्वामध्ये उत्साह असायचा. श्रमदान असो की आर्थिक. एकच वाक्य सगळ्यांकडून एकायला मिळायच, ते म्हणजे मॅंडम काय लागतं ते सांगा हो. काळजी करू नका. आम्हालाही असा भक्कम आधार मिळाल्यावर, आमचा उत्साह व्दिगुणीत व्हायचा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन यानिमित्ताने गावातील मंडळी तर उपस्थित असतातच पण नोकरी-व्यवसाय निमित्ताने बाहेर गावी असणारे मान्यवर देखील आवर्जुन उपस्थित असतात. मुलांना बक्षिस देऊन प्रोत्साहन देतात. कौतुकाची थाप देतात. शाळेच्या भौतिक दृष्टीने कोणत्या अडाचणी आहेत, ते जाणून घेऊन सगळ्यांनी त्या पूर्ण करण्यासाठी कंबर कसली होता. नवनीवन कामांना सुरूवात झालेली. सगळं अगदी सुरूळीत चालू होत. कोरानासारख्या भयंकर आजाराने लॉंकडाऊन होते. त्यामुळे आमची शाळा बंद होती. आता हळुहळु लॉकडाऊन कमी होत होते. सगळ्यांना आतुरता होती नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्याची.

मुलांच्या किलबिटाने ती सजीव वाटणारी निर्जिव वास्तू जणू आमच्याकडे दयनीयपणे पहाता होती. अशीच किती दिवस राहील माझी अवस्था? असा प्रश्न विचारत होती. कधी होईल सर्व पूर्ववत? दारिद्र्याच्या दशेसारखी तुटक्या पत्रांच्या रूपाने लोंबत असलेली तिची लक्तरं खुणावत होती.

आता प्रतिक्षा त्या दिवसाची. रोजच मुलांच्या सहवासाने यात्रेसारखे भासणारे ज्ञानमंदिर पहाण्याची.

**(सुरेखा अजेसिंग निकुंभ (ठोके) या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुंडाळवाडी ता.खेड जि.पुणे येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.)**


**शिक्षणयात्री मासिक वर्गणीदार होण्यासाठी**

09881199743

**With pay any app**

# शिक्षण गंगा

नवीन काही...



**तुषार महाले**
धुळे
९७६५४५६७९५

कोविड १९ च्या या काळात राज्य पातळी वरुन तसेच काही शिक्षक आपल्या कल्पकतेनुसार अनेक शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत. त्यातच भर म्हणुन आपल्या पंचायत समिती धुळे मार्फत सुरु होणारे शैक्षणिक इंटरनेट रेडीओ शिक्षणगंगा धुळे हा विद्‌यार्थ्यांचे शिक्षण अविरत व आनंदायी राहण्यासाठी एक अभिनव उपक्रम आहे. जास्तीत जास्त विद्‌यार्थी पालक व शिक्षकांनी या (APP) व रेडीओ कार्यक्रमांचा लाभ घ्यावा. छोट्या दोस्तांना हे कार्यक्रम नक्की आवडतील याची मला खात्री आहे.

**मा.श्रीम.तृप्ती घोडमिसे(IAS)**
गटविकास अधिकारी,पंचायत समिती,धुळे




निमित्त होते दिवाळी सुटीचे. या दिवाळीच्या सुटीतही विद्यार्थ्यांसाठी काही करता येईल का ? या विचारातून पंचायत समिती धुळे च्या विद्यमान गटविकास अधिकारी माननीय तृप्ती घोडमिसे (IAS) यांनी गटविकास अधिकारी सुरेखा देवरे यांकडे रेडीओ ची संकल्पना मांडली व तालुक्यातील काही तंत्रस्नेही शिक्षकांना बोलवून त्यांकडे याविषयी चर्चा करण्यास सांगितले.त्यातुन मा.गटशिक्षणाधिकारी व मा. रत्नप्रभा दंडागव्हाळ (शि.वि.अ. पंचायत समिती धुळे) यांनी तालुक्यातील काही तंत्रस्नेही शिक्षकांशी शाळा बंद पण शिक्षण सुरु या कार्यक्रमांतर्गत रेडीओ उपक्रमाविषयी चर्चा केली.मा. गटविकास अधिकारी यांनीही त्यांची संकल्पना अधिक स्पष्ट करुन हे करता येईल का ? अशी अपेक्षा केली. प्रणव पाटील (आय.टी. विषय सहायक डायट धुळे) व तुषार महाले (विज्ञान विषय शिक्षक जि.प.शाळा सरवड) मी.स्वत: होकार दिला हे होऊ शकते आणि प्रवास सुरु झाला एका अभिनव उपक्रमांच्या निमित्तीचा.

सर्वप्रथम संकल्पना समजून घेतल्यानंतर यात काय कामे करावी लागतील आणि त्यांचे

स्वरुप कसे असेल यांची एक रुपरेषा आखण्यात आली.ज्यात सर्वात प्रथम होते ते म्हणजे प्रसारणासाठी आवश्यक अध्ययन घटक. त्याचा श्रीगणेशा व जबाबदारी घेतली. ती मा दंडगव्हाळ यांनी. त्यांनी आपल्या बीटातील शिक्षकांना याविषयी आवाहन केले व नाविन्यपूर्ण कामात रस असलेल्या निवडक शिक्षकांची सामाजिक अंतराचे नियम पाळून एक सभा घेतली. ज्यात मा. गटशिक्षणाधिकारी, प्रणव पाटील व मी स्वत उपस्थित होतो. ज्यात शिक्षकांशी प्रत्यक्ष संवाद साधुन घटक चर्चा करण्यात आली. कार्यक्रम हे श्रवणीय असण्यासाठी योग्य आवाज, त्यातील चढउतार, आवश्यक बलाघात, योग्य ती शब्दफेक त्यांच्या वेग, योग्य त्या ठिकाणी विराम या व अशा सर्व नियमांचे पालन करुन आवाज कसा रेकॉर्ड करायचा हे सांगण्यात आले. त्याचबरोबर आपल्याकडे कोणतेही व्यावसायिक उपकरणे नसतील आवाज रेकॉर्ड करायचा तेव्हा आपल्या मोबाईल वर हेडफोन च्या मदतीने असे रेकॉर्डिंग कसे करावे हे देखील सांगण्यात आले. माइक किती अंतरावर व कोणत्या कोनात पकडावा येथपासून सर्व बाबी त्यांना सांगण्यात आल्या. आवाज रेकॉर्ड करतांना तो शांत जागी जेथे हवेचा देखील आवाज नको तसेच रेकॉर्ड सुरु करण्याआधी काही सेकंद व बदं करतांना काही सेकंद थांबून मग करावे अशा महत्वाच्या सर्व बाबी त्यांना सांगण्यात आल्या .उपस्थित सर्व शिक्षकांना या उपक्रमाविषयी प्रचंड उत्सुकता व आपण यात सहभागी होऊ या आत्माविश्वासाने घटक निर्मितीचे कार्य या शिक्षकांनी स्वीकाराले व या अभिनव उपक्रमाच्या प्रवासाला वेग मिळाला.

आता गरज होती ती एका गोड आवाजाच्या निवेदकाची मग काय पुन्हा शोध सुरु झाला.मा. गटशिक्षणाधिकारी देवरे व मा.शि.वि.अ.दंडगव्हाळ यांच्याशी चर्चा करुन पुन्हा काही शिक्षक बंधूभगिनी यांना संपर्क साधून त्यांची आवाजाची रेकॉर्डिंग ऐकण्यात आली व दिशा काकडे यांची निवेदक म्हणुन निश्चिती झाली.

## स्तुत्य उपक्रमाबाबत प्रतिक्रिया!

रेडीओ शिक्षणगंगा धुळे ही राज्यातील पहिलीच शैक्षणिक इंटरनेट रेडीओ वाहिनी आहे. आपल्या शिक्षण विभाग पंचायत समिती धुळे मार्फत सुरु होणाऱ्या या उपक्रमाचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा व आपले शिक्षण असेच आनंददायी व नियमित ठेवावे. कोविड चा या काळात शाळा बंद आहेत.पण शिक्षण सुरु आहे. तेव्हा तुम्ही सर्व विद्यार्थ्यांनी देखील स्वत:ची काळजी घ्या व अभ्यास करा,रेडीओ व्दारे शिक्षण आनंद घ्या.

**–मा.प्रा.विजय पाटील**
**सभापती पंचायत समिती,धुळे**

कोविड १९ च्या या काळात ऑनलाईन ऑफलाईन शिक्षण शिक्षक देत आहेतच त्यात्तच धुळे पंचायत समिती मार्फत सुरु झालेले रेडीओ शिक्षणगंगा ही इंटरनेट रेडीओ वाहिनी विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण आनंददायी व्हावे म्हणुन अतिशय नाविन्यपूर्ण उपक्रम आहे.सर्व विद्यार्थ्यांना याचा नक्कीच फायदा होईल.

**–मा.मनीष पवार**
**शिक्षणाधिकारी(प्राथ) जि.प.धुळे**

आता कामांची दिशा निश्चीत झाली होती ती म्हणजे शिक्षकांना आवाहन करुन शैक्षणिक घटकांचे ऑडीओ व निवेदनाचे मात्र खरे काम यानंतर होते ते म्हणजे त्या आवाजावर योग्य संस्कार करुन घटक व निवेदनाचे ऑडीओ यांचा क्रम निश्चीत करुन त्यांला रेडीओ कार्यक्रमासाठी अंतिम स्वरुप देणे. जे प्रणव पाटील व मी स्वत: करणार होतो, कारण त्यात अनेक तांत्रिक बाबी समाविष्ट होत्या.

वाटले तितके सोपे नक्कीच नव्हते. मात्र एकदा होकार दिल्यानंतर व इतका अभिनव प्रयोग असल्याने काम सुरुच होते. शिक्षकांनी पाठविलेले ऑडीओ क्लीप या नुसत्या ऐकवल्या तर त्या श्रवणीय होणार नव्हत्या म्हणुन त्या बॅकग्राऊंड संगीत देण्याचे ठरवून योग्य ते संगीत निवडून ते देण्यात आले .आलेले सर्व ऑडीओ क्लीप या सारख्या आवाजाच्या उंचीच्या नव्हत्या. तेव्हा त्यांना सारख्या उंचीचा आवाज असावा म्हणुन यांवर काम करावे लागले. त्याचबरोबर प्रत्येक घटकांनंतर निवेदनाचा काही भाग असा क्रम यासर्वांसाठी अगदी प्रत्येक दिवसाचा कार्यक्रमास निश्चीत अंतिम रुप देण्यासाठी किमान ३-४ तास रोजच द्यावे लागले. मात्र या सर्व कामाचा आनंद व उत्साह हा दिवसाबरोबर वाढत गेला .त्यात पुन्हा मा. गटविकास अधिकारी यांनी सूचना केली की हे कार्यक्रम शिक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी लिंक देण्याऐवजी एखादे (App) तयार करता येईल का ? मग काय पुन्हा एका नवीन प्रेरणेने (App) निर्मितीही केली ज्यात सदर (App) चा एक लोगो देखील तयार करण्यात आला. यात (App)मध्ये फक्त रेडीओ नाही तर सदर उपक्रम सर्व शिक्षक पालक व विद्‌यार्थी यांना लाभदायी होण्यासाठी फेसबुकपेज, ट्विटर अकाऊंट, इंस्टाग्राम (App) व स्पोटीफाय यांसारख्या सोशल मिडीया व (App) चा उपयोग करुन रेडीओ शिक्षणगंगा धुळे चे स्वतंत्र खाते तयार करुन त्यातुन ही या शैक्षणिक इंटरनेट रेडीओ विषयी सर्व माहिती प्रसिध्द करण्यात आली.सदर (App) मध्ये रेडीओ अलर्ट संदेश, क्षणचित्रे, पोडकास्ट, प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमाचे वेळापत्रक, निर्माते, फेसबुक, ट्विटर यांचाही समावेश करुन सर्वाच्या पसंतीचे परिपूर्ण (App) बनविण्यात आले. या सर्व कामाच्या व्यापात दिवाळीचा मूहुर्त मात्र टळला होता.पण उपक्रमाची दिशा इतकी परिपूर्ण होती की वेळ लागला चालेल पण एक परिपूर्ण तयारीनिशी प्रसारण सुरु करु या मा.गटशिक्षणाधिकारी यांच्या प्रेरणेने रेडीओचे काम पूर्ण केले. प्रत्यक्ष प्रसारण हे दि.२३/११/२०२० वार सोमवार पासून करण्याचे निश्चीत करण्यात आले. (Whats App) वरील सविस्तर माहितीपूर्ण सदेशातून उपक्रमाची संपूर्ण माहिती व रेडीओ चे (App) डाऊनलोड करण्यासाठी एक स्मार्ट (Pdf)तसेच मार्गदर्शक (Pdf)देखील बनविण्यात आली. रोज प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांचे वेळापत्रक देऊन त्याविषयी उत्सुकता निर्माण करुन माहिती देण्यात आली. मा. प्रा.विजय पाटील (सभापती पंचायत समीती धुळे) व मा.तृप्ती घोडमिसे (गटविकास अधिकारी पंचायत समिती धुळे) यांचे मार्गदर्शन पर शुभेच्छा संदेशांचे देखील प्रसारण कार्यक्रमाच्या सुरुवातीला करण्यात आले. अशा संपूर्ण तयारीसह शैक्षणिक इंटरनेट रेडीओ शिक्षणगंगा धुळे चा अविरत व अखंड प्रवास सुरु आहे. सदर कार्यक्रमांचे थेट प्रसारण सकाळी ठिक ८.०० वाजता व पुन:प्रसारण सायंकाळी ठिक ६.०० वाजता असे दिवसातून दोन वेळा केले जाते. तसेच ज्या विद्‌यार्थ्यांना या दोन्ही वेळेत देखील हवे तेव्हा ऐकण्यासाठी सदर (App)

वर उपलब्ध देण्यात आलेले आहे.

या उपक्रमाचे यश हे उपक्रमाची संकल्पना असणाऱ्या मा.तृप्ती घोडमिसे (IAS)(गटविकास अधिकारी), मार्गदर्शक मा.सुरेखा देवरे (गटविकास अधिकारी), मा. रत्नप्रभा दंडगव्हाळ (शि.वि.अ.), प्रणव पाटील (आय.टी. विषय सहायक), तुषार महाले (विज्ञान विषय शिक्षक) व शैक्षणिक घटक पाठविणाऱ्या सर्व शिक्षकांचे आहे. शिक्षण विभाग पंचायत समिती धुळे तर्फे सुरु करण्यात आलेला हा शैक्षणिक इंटरनेट रेडीओ शिक्षणगंगा धुळे हा राज्यातील प्रथमच प्रयोग असेल.सर्वात महत्वाचे ते हे की सदर उपक्रम हा शुन्य खर्च या तत्वावर राबविला जात आहे. ज्यात एकही रुपया गुंतवणूक किंवा खर्च अद्याप लागलेला नाही आणि सांगतांना आनंद होतो की फक्त एक आठवड्याचा प्रसारणातच हे उपक्रम ८३२ हून अधिक विद्यार्थी पालक व शिक्षकांच्या पसंतीस उतरले आहेत.

**(तुषार अशोक महाले हे विषय शिक्षक म्हणून जि.प. शाळा सरवड ता.जि.धुळे येथे कार्यरत आहेत.)**

## प्रतिक्रिया

रेडिओ शिक्षणगंगा या कार्यक्रमात घटकांचे इयत्तावार समावेश असल्याने तसेच कार्यक्रमांची निवड ही गाणी गोष्ट यांसह मनोरंजक असल्याने माझे सर्व विद्यार्थी आवडीने ऐकत आहे.

राजेंद्र पाटील (उपशिक्षक)
जि.प.शाळा अंचाडेतांडा धुळे.

रेडिओ शिक्षणगंगा या कार्यक्रमातील घटक निवड ही शैक्षणिक व रंजक अध्ययन घटकांची असल्याने विद्यार्थी आनंदाने त्यावरील कार्यक्रम न चुकता ऐकतांना दिसून आले. विशेष म्हणजे यातील सर्व घटक हे स्वत: शिक्षक तयार करत असल्याने एक हक्कांचे व्यासपीठ आम्हां शिक्षकांना मिळाले.

-राकेश केदार (उपशिक्षक)
जि.प.शाळा अम्बोडे धुळे

रेडीओ शिक्षणगंगा हा अभिनव प्रयोग सर्व विद्यार्थ्यांना अतिशय आवडत आहे. यातील कविता गाणी ही तालबध्द असल्याने मुलेही सहज गुणगुणत असतात. पाध्ये कविता मुले आनंदाने पाठ करतांना व म्हणतांना दिसून येत आहेत.

-स्मिता सराफ (उपशिक्षिका)
जि.प.शाळा निकुंभे धुळे

आम्ही आहोतच वेगळे

# लायर बर्ड (वीणापक्षी)

समान वैशिष्ट्यांच्या आधारे सजीवांचे वर्गीकरण केले जाते. पण काही सजीव असे असतात की त्यांचे समजातीपेक्षा एखादे वैशिष्टय वेगळे असते किंवा दुसऱ्या जाती/प्रजाती/वर्गाची वैशिष्टये त्यांच्यात आढळून येतात. अशी विचित्र संगम असलेली वैशिष्ट्ये त्या सजीवांना वेगळेपण प्राप्त करून देतात, ते अधोरेखित करणारे हे सदर 'आम्ही आहोतच वेगळे!'



**डॉ.नंदा हरम**
विज्ञान प्रसारक,पुणे
९३७२९१०३०६

महेश: आई,आपण पोपट पळायचा का?

आई: हे मध्येच खुळ कसं काय आलं तुझ्या डोक्यात ?

महेश: अग,मी आज माझ्या मित्राकडे गेलो होतो ना,संदीपकडे... त्यांच्याकडे आहे पोपट. तो इतकी मस्त सगळ्यांची नावं घेतो, शिट्टी वाजवतो.

आई:असं ! मला ही माझा बाळ खुप आवडतो. माझ्याशी गप्पा मारण्याकरिता ठेवू का तुला पिंजऱ्यांत ? इथे स्वयंपाकघरात ?

महेश: काहीतरीच आई तुझं...

आई: बघ,तुला कल्पना ही सहन झाली नाही ना? पक्ष्यांना उडू दे मुक्तपणे आकाशात त्यांना असं का कोंडायचं!

महेश:नाही आई,परत नाही मी विचारणार असं काही...

आई: महेश बेटा,नाराज नको होऊस! पोपट छान शीळ घालतो,बोलतो,म्हणुन तुला आवडतो ना?

महेश:हो....

आई: महेश,बऱ्याच पक्ष्यांकडे आवाजाची नक्कल करायची क्षमता असते आपला नेहमीच्या पहाण्यातला सांग बरं कोणता पक्षी?

महेश: मला वाटतं !मैना ती नक्कल करते,इतर पक्ष्यांच्या आवाजाची!

आई: अगदी बरोबर ! आणखी एका पक्ष्याबद्दल सांगतो,गंमत वाटेल तुला..

महेश: कोणता गं?

आई: लायर बर्ड (Lyrebird),त्याला 'वीणा पक्षी' ही म्हणतात.

महेश: वीणेसारखा आवाज करतो का?

आई: नाही,नाही.नराच्या शेपटीचा आकार वीणेसासारखा असतो.

महेश: हा लायरबार्ड कोणकोणते आवाज काढतो?

आई: या पक्ष्याचं वैशिष्टये म्हणजे हा फक्त नैसर्गिक म्हणजे इतर पक्ष्यांचेच आवाज काढत नाही,तर आजुबाजूच्या परिसरातील कृत्रिम म्हणजे यंत्रांचे सुध्दा आवाज काढतो.


महेश: बाप रे ! पहिल्यादांच ऐकतोय मी...कुठे आढळतो हा पक्षी?

आई: हा ऑस्टोलिया आढळतो. हा पक्षी जसा आवाजाकरिता ओळखला जातो, तसेच नर पक्षी त्याच्या पिसाऱ्या करिता प्रसिध्द आहे.(आकृती क्र. १ पहा )



महेश : मोराच्या पिसाऱ्यासारखा असतो का ?

आई : नाही ,बाळा! त्याच्या पिसारा थोडा गुंतागुंतीचा असतो. त्यांच्या पिसाऱ्यांचे घटक असतात-२ लायरेटस् lyrebird ,१२ तंतूमय पिंसं आणि २ मध्यम कडक पिसं (आकृती क्र २ अ पहा )




महेश:हो ग,वेगळीच आहे रचना!

आई: लायरेटस रुंद,वक्राकार आणि पट्टेवाले असतात.याच्या टोकाचा भाग रुंद,काळा, किलावराच्या आकारासारखा असतो.तंतूमय पिसं वरुन गडद रंगाची आणि खालून चंदेरी असतात.मधली २ कडक पिसंही गडद रंगाची असतात.

महेश:लायरेटस किती छान दिसतात ना!


आई: लायरेटस फार आकर्षक असतात. (आकृती क्र २ ब पहा)




लायरेटसच्या मधल्या शिरेजवळ खालच्या बाजुला पांढऱ्या रंगाची असते तर वरती चमकदार केशरी ते काळ्या रंगाच्या छटा असतात. संपूर्ण पिसावर पट्टे असतात.बाहेरच्या कडेला पारदर्शक खाचा असतात. टोक चमकदार काळ्या रंगचे असुन गोलाकार असते.बेल अडकवल्यासारखे दिसते

महेश: आई,तु म्हणाली नाहीस की या पक्ष्याला वीणापक्षी म्हणतात म्हणुन!

आई:बोलवण्याच्या ओघात सांगायचं राहीलं बघ! अरे, लायर (lyre) हा ग्रीक शब्द आहे. छोट्या तंतूवाद्याला लायर म्हणतात. दिसायला ते छोट्या वीणेसारखे असलं तरी त्यात काही महत्वाचे फरक आहेत.(आकृती क्र ३ पहा )



महेश:तू म्हणालीस,नराला हा पिसारा असतो.मग

मादीची पिसं कशी असतात !
आई: मादीला ही लायरेटस असतात,पण ती आखुड असतात.(आकृती क्र ४ पहा.)



तिला तंतूमय पिसं नसतात.तिच्या शेपटीला गोलाकार टोकं असलेली रुंद तपकीरी पिसं असतात.
महेश:पिल्लांना हा पिसारा लगेच येतो का ?
आई : चांगला प्रश्न विचारलास महेश! पिल्लांना प्रौढत्व यायला बरीच वर्षे लागतात. नराला पूर्ण पिसारा विकासित व्हायला ७ ते ९वर्षे तर मादीला ३ ते ५ वर्षे. त्यामुळे अपरिपक्व नर सुरुवातीला मादीसारखाच दिसतो.
महेश: या पिसाऱ्याचा उपयोग काय ?
आई: हिवाळ्याचे दिवस हा त्यांच्या प्रजोत्पादनाचा काळ असतो.गर्द झुडूपात नर घरटं म्हणजे मातीचा ढिगारा तयार करतो.(आकृती क्र ५ पहा).



त्यावर उभं राहून तो वेगवेगळे मधुर आवाज काढतो आणि पिसारा फुलवितो नृत्य करतो.मुख्य हेतू म्हणजे मादीला आकर्षित करणे.
महेश: आई मला हे ऐकताना मोर आणि लांडोरची आठवण येतेय.
आई:अगदी बरोबर !मादी लायरबर्ड एक अंडं घालते. ती एकटी ५० दिवस उबवते.त्यातून बाहेर आलेल्या पिल्लांची तीच काळजी घेते, वाढवते.
महेश: आई,या पक्ष्यांच्या गाण्याविषयी, नकलाविषयी सांग ना
आई: हा पक्षी वर्षभर गातो, पण जून ते ऑगस्ट,या प्रजोत्पदनाच्या काळात त्याचं गाणं टिपेला पोहोचतं. सर्वांत जास्त तीव्रतेने ते या काळात गातात.या काळात दिवसाचा अर्धा वेळ म्हणजे जवळ-जवळ ४ तास ते गातात.
महेश: आपल्याकडे कोकिळा जसी ओरडते,तसा विशिष्ट आवाज असतो का ?
आई: या पक्ष्यांचा आवाज किंवा गाणं म्हणजे त्याचं स्वत:चं गाणं आणि इतर पक्ष्यांचा आवाजाची नक्कल,याचं सुरेख आणि सुरेल मिश्रण असतं.जवळ-जवळ २० ते २५ वेगवेगळ्या पक्ष्यांच्या आवाजाची तो नक्कल करतो.
महेश: त्याचं स्वत:चं गाणं असतं की नाही !
आई: हो ,त्याचं गाणं असतं,पण एकूण आवाजात ८०% नकलांचाच समावेश असतो या आवाजात बाबातीतील एक रोचक गोष्ट सांगण्यात येते.
महेश: कोणती गं ! सांग ना पटापट..
आई:१९२० सालची ऑस्ट्रोलिच्या न्यू साऊथ वेल्समधील गोष्ट आहे.लायरबर्डच पिल्लु एकाच्या घरात वाढत होतं. त्या घरातील व्यक्ती बासरी वाजवत असे.त्या पिल्लांना नंतर जंगलात सोडलं, तर ते पिल्लु बासरी वाजवलेली ती गाणी जशीच्या तशी वाजवत असे. त्या भागातील लीयरबर्डनी ती धून आत्मसात केली.
महेश:खरंय,कमाल आहे नाही! याव्यातिरिक्त कृत्रिम आवाजांची ही ते नक्कल करतात ना ?
आई: हो तर... करवतीचा आवाज,कारचं

इंजिन,बंदुकीचा, आवाज कॅमेराच्या शटरचा आवाज,वाफेचं इंजिन

महेश: हे मी पहिल्यादांच ऐकतोय... बरं... हे किती मोठे असतात ? त्यांना उडता येतं का ?

आई: तसे आकाराने बऱ्यापैकी मोठे असतात. त्यांच्या दोन जाती आहेत. त्यांतील मोठ्या आकाराचा सुपर्ब लायरबर्ड असतो-७४-८४ सेंमी लांबी असलेली मादी,तर ८०-९८ सेंमी लांबीचा नर असतो. अल्बर्टस लायरबर्ड सुपर्बपेक्षा थोडासाच लहान असतो, मादी ८० सेंमी तर नर ९० सेंमी लांबी. दुसरा फरक म्हणजे अल्बर्ड लायरबर्डसचे लायरेटस लहान आणि तेवढे आकर्षक नसतात.लायरबर्ड उडण्यात वाकबगार नसतात. बहुतांश वेळ ते जमीनीवरच असतात.

महेश:याचा अर्थ जंगलात जमिनीवर सापडणारे किडे हे त्यांचं खाद्य असेल ना ?

आई: अगदी बरोबर !

महेश: आई, तू सांगितलंस नर लायरबर्ड वेगवेगळे आवाज काढतो,नक्कल करतो.मग मादी लायरबर्डकडे ही क्षमता नसते का.

आई: मादीकडे क्षमता असते. काय झालं महेश...मादीला आकर्षित करण्यासाठी नर पिसारा फुलवतो.,नृत्य करतो, वेगवेगळे आवाज काढतो. त्यामुळे त्याच्याकडे जास्त लक्ष केंद्रीत झालं. पण हल्ली संशोधकांनी मादी लायरबर्डच्या आवाजात अभ्यास केला.

महेश: काय कळलं त्यांच्यावरुन ?

आई: नर जेव्हा मादीला आकर्षित करायला आवाज काढतो, तेव्हा मादी शांत असते .तुला मी आधी सांगितलं ना की अंडं उबण्याचं तसंच पिल्लाचं संगोपन करण्याचं काम मादीच करते.त्यामुळे अन्न गोळा करताना तसेच घरटयाचं संरक्षण करताना ती वेगवेगळे आवाज काढते.

महेश:ते आवाज सारखे असतात की वेगवेगळे ?

आई:छान प्रश्न विचारलास महेश! जसा संदर्भ बदलतो, तसा तिचा आवाजाचा प्रकार ही बदलतो. म्हणजे असं...अन्न गोळा करताना ती विशिष्ट आवाज काढते तर घरटयाचं रक्षण करतांना धोक्यांची सुचना देणारा इशारा त्यांत असतो.

महेश: या मादी दुसऱ्या पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करतात का ?

आई:महेश,या मादी आवाज काढतात ते खूप वेगवेगळ्या प्रकारचे आणि गुंतागुंतीचे असतात. त्याचं ढोबळमानाने वर्गीकरण करता येईल ते असं-(१) त्यांचे स्वत:चे विशिष्ट असे इशारा देणारे आवाज(Alaram Calls) (२)लायरबर्ड -विशिष्ट शीळ-वादन(Whistle song) आणि (३) अनुकरणाने केलेले आवाज (Mimetic Vocalization)

महेश:आई...याचा अर्थ मादीच्या आवाजाला किंवा शीळ वादनाला महत्व आहे.

आई: महेश,एक लक्षात ठेवायचं, निसर्गात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी कारण असतंच ऊर्जेचा कधीही अपव्यय केला जात नाही..

महेश: आई, पूर्वी तू मला सांगितलं होतंस ना की ऑस्ट्रोलियात प्लॅटिपस आणि इकिडनाला खूप महत्व दिलं जातं तसंच महत्व लायरबर्ड ही आहे का गं ?

आई: तुझा रोख आला माझ्या लक्षात! नर सुपर्ब लायरबर्डचा चिन्हात किंवा प्रतिक म्हणुन वापर केला गेला आहे. उदा- १९३२ सालच्या एक शिलिंगच्या पोस्टाच्या तिकीटावर (आकृती क्र ६ पहा),




ऑस्ट्रोलियन १० सेंटच्या नाण्याच्या मागच्या बाजूवर लायरबर्ड विराजमान आहे. तसेच न्यू साऊथ वेल्स नॅशनल पार्कस आणि वाईल्डलाईक सर्व्हिस चं प्रतीक आहे.

(आकृती क्र ६ ब पहा )

महेश: वा,मस्त! पोपटाचा हट्ट केला खरा,पण मला




चांगली माहिती सांगितलीस तू लायरबर्ड विषयी. आई, एक सांगू ?

आई :सांग ना...

महेश: मी मोठा झालो की ऑस्ट्रोलियात हे सगळे प्राणी,पक्षी बघायला जाणार...

आई: अगदी खुशाल...

शिक्षणयात्री

## आताच सभासद व्हा !

४०० एक वर्ष

७०० दोन वर्ष

१००० तीन वर्ष

२०२१ या नव्या वर्षात ...आकर्षक मांडणीसह...
विविध शैक्षणिक प्रवाहांच्या अनुभूतींसह...वाचकांसाठी स्पर्धा-पुरस्कारांसह

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री

क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

With pay any app

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No.

दखल

# ऑनलाईनचा प्रताप... भविष्यात ठरेल डोक्याला ताप?



**टी.विद्यानंद**
पदवीधर अध्यापक जि.प.नाशिक
९४०४५८५८८६

नाहीतर आपल्याच या नसत्या ऊठाठेवींतून गड पण गेला अन् सिंह पण गेला व्हायचं... अन् पुन्हा हाच आपल्या आताच्या हव्याहव्याशा ऑनलाईनचा प्रताप मात्र ठरेल आपल्याच डोक्याला नकोनकोसा ताप...!! म्हणूनच शिक्षण थांबू न देता चालू ठेवायचच आहे. पण ते सावकाश आणि नैसर्गिक पद्धतीनेच... हळूहळू शिकलं तरी काहीच बिघडणार नाही. काहीच नाही. कारण....

यह बात बिल्कुल मायने नहीं रखती की आप कितना धीमे चल रहे हैं, जब तक की आप रुकें नहीं।

सुरूवात करण्यापूर्वीच शिक्षणाबाबतची सर्वांत महत्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. ती म्हणजे शिक्षण फक्त विशिष्ट ठिकाणीच नव्हे तर सर्वत्रच सदासर्वकाळ चालूच असते आणि ती एक प्रक्रिया आहे. संस्कार आहे. देण्याघेण्याची बाब मुळीच नाही. कारण देण्याघेण्याचा व्यवहार करायला शिक्षण म्हणजे काही बँक नाही. आता पुढे ऑनलाईनकडे वळूया. सध्याच्या सगळीकडेच भूछत्र्यांप्रमाणे बोकाळलेल्या व वेगाने वणव्यासारखं पसरत चाललेल्या ऑनलाईन शिक्षणाचा आग्रह धरणारे अन् लेकरांचं खूपच शैक्षणिक नुकसान होतय म्हणत बोंबाबोंब करून,



स्वतःच्या जीवाचा आटापिटा करणारे (व तो लेकरांनाही करायला लावून) या ऑनलाईन शिक्षणास जुंपणारे मायबाप मानसिकदृष्ट्या सैरभैर तर झाले नसतील ना या सततच्या लॉकडाऊनमुळं?? अशी शंका येतेय मला आता. या विद्वानांना एवढीही कल्पना वा समज नाही की पुढचं शिकत बसण्यापेक्षा हा बंद चा कालावधी ही एक सुवर्णसंधीच समजून , लगतच्या मागील एक वा दोन इयत्तांचा झालेलाच अभ्यास जर मन लावून १००% पूर्ण करण्यात घालवला तर त्या लेकराला आयुष्यात पुन्हा मागे वळून पहाण्याची कधीच गरज पडणार नाही. (हे एक सूर्यप्रकाशासारखं लख्खं

सत्यच आहे. याबाबत कोणाची काहीएक हरकत नसावी.) आज ही ६०-७०% विद्यार्थी मागच्या लगतच्याच एक/दोन इयत्तांचे पेपर नीट सोडवू शकणार नाहीत वा अपेक्षित सर्व क्षमतांना योग्य न्यायसुद्धा देऊ शकणार नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. (हे जणू सर्वजणांसाठी एक उघडच गुपित आहे.) पण या दिव्यशक्तीधारक प्रकांड पंडीतांना ( _हो... हा च शब्द चपखल बसतो. कारण ज्यांना या औपचारिक अभ्यासापुढं स्वतःच्याच लेकराच्या मानसिक गरज व अवस्था, शारिरीक अवस्था यांची मुळीच काळजी नाही त्यांना 'बुद्धिमान वा देवदूत' म्हणायचं का? ज्यांना तसं म्हणवून घ्यावच वाटतं त्यांनी मग तसं समजलं तरी मला परमानंदच आहे.) हे समजावून सांगणार तरी कोण? अहो, शहरं तर शहरं... आता तर ग्रामीण भागाचही तेच. वा रे वा येड्यांची जत्रा. त्या बिच्चारे लेकरांच्या शारिरीक अन् मानसिक आरोग्याची वाट लावताना यांना काहीच कशी काय नाही राव वाटत? (हे देशाचं भविष्य घडवणं आहे की पद्धतशीरपणे बिघडवणं याचा विचार करा रे आता तरी...!) जर त्या लेकराला आज ही मागच्या-लगतच्या एक वा दोन इयत्तांचचं पूर्णपणे आकलन झालेलं नाही हे जर आपल्याला कळतयं वा समोर धडधडीतपणे दिसतयं. तर मग त्याला पुढचं शिकवण्यासाठीची आपली एवढी प्रचंड घाई आणि धडपड / धावपळ का? जर ती नाही असं म्हणावं तर मग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचं अगदी आयुष्यभरासाठीचं प्रचंड नुकसान होत आहे ची बोंबाबोंब नेमकी कशासाठी आणि कोणासाठी चाललीय? कोणी आणि का चालवलीय? याचा लाभ नेमका कोणाला होतोय? मुळात ही आवई ऊठलीच कोठून? मोबाइल कंपन्या आणि ऑनलाईन संबंधी सेवा प्रदान करणारे यांचं तर हे नियोजित रग्गड नफ्यासाठीचं पातक नाही ना? हे सुद्धा पहावं लागेल. जेव्हा ही ऑनलाईन एज्युकेटेड लेकरं भविष्यात मानसिकरित्या अन् काही प्रमाणात शारिरीकरित्याही उध्वस्त होतील ना याच प्रिय ऑनलाईनपायी, तेव्हा हेच विद्वान मायबाप अन् सध्या गल्लीबोळांत (स्वयंघोषित नबाबाप्रमाणे) निर्माण झालेले स्वयंघोषित शिक्षण तज्ञ उलट्या बोंबा मारायला सुरवात करतील, की ऑनलाईनमुळच आमच्या विद्यार्थ्यांचं वा पाल्यांचं मानसिक,भावनिक संतुलन बिघडल्यासारखं वाटतेय वा बिघडलेय... डोळ्यांना फारच त्रास होतोय म्हणून चष्मा घ्यावाच लागला... पाठ, डोकं, मानदुखीची प्रचंड समस्या निर्माण झालीय.. खूपच त्रास होतोय.. आता मग पुढं त्यांचं काय अन् कसं होणार? म्हणून हे ऑनलाईन आता पूर्णत:च बंद करा. बंद म्हणजे कडेकोटच बंद... तेव्हा पहिलं तर हे नामधारी स्वयंघोषित तज्ञ ( त्यावेळी याच सध्याच्या स्वयंघोषित तज्ञांना कोरोनाकाळातील म्हणजेच भूतपूर्व शिक्षणतज्ञ समजावं.) आणि मायबाप उजवले पाहिजेत. कारण पुन्हा एकदा ठामपणे सांगतो की निदान उच्च प्राथमिक पर्यंत तरी नियमित शिक्षणाला ऑनलाईन शिक्षण हा पर्याय कधीच ना भूतकाळात नव्हता; ना भविष्यात कधी असेल. (तो फक्त अधूनमधून मदतीचाच एक मार्ग असू शकतो. बस्स एवढच...यापेक्षा जास्त नाहीच.) अन् जेव्हा तो पर्याय म्हणून असेलच कधी, तेव्हा शिक्षणातून सुजाण व निरोगी नागरिकच घडावा ही अपेक्षा मात्र मूळासकट उपटून फेकली गेलेली असेल. या भविष्यात काडीचाही बदल होणार नाही. हे शिक्षणाचे मानसशास्त्र आहे. काहीजणांच्या ऑन-लाईनची ही लाईन, याच लाईनवर असलेल्या अनेक चांगल्या लेकरांबरोबरच काही विविध

कारणांमुळे या लाईनवरच येता न आलेल्या कित्येक चांगल्या निरागस लेकरांना सुद्धा नैराश्याच्या प्रचंड मोठ्या खाईत घेऊन जाईन याची अजून उच्च शिक्षित असूनही पराकोटीचे अडाणीपण असलेल्या पालकांना (व सुजाण म्हणवल्या जाणाऱ्या नागरिकांनाही) कल्पनाच नाही. पण बिचारे लेकरांच्या दुर्दैवाने हे ऑनलाईन शिक्षण आणखी फक्त २/४ महिने जरी असच चालेल ना तेव्हा त्याच उच्चशिक्षित अन् बोंबाबोंब करणारया मायबापांचे स्वतःचे डोळे उघणार वगैरेचं नाही माहित मला... पण ऑनलाईनमुळं लेकरांची झालेली अवस्था पाहून आता स्वतःचेच डोळे कायमचे बंद करावेत की काय असं वाटण्याची वेळ मात्र मायबापांवर स्वतःवरच येणार... ही काळ्याकुट्ट दगडावरची पांढरीशुभ्र रेघ नाही तर अखखा मोठा पट्टाच समजा... हा झाला एक धोका.

आता दुसरा मोठा आणि तेवढाच भयानक धोका पण पहा. अशी कित्येक हुशार परंतु अत्यंत गरीब वा हलाखीच्या कुटुंबातली लेकरं आहेत; की ज्यांच्याकडं नेहमीच दररोजच्या जेवणाचीही भ्रांत असते. आणि आता या लॉकडाऊनमुळं तर त्यांच्या अर्थिक अडचणींना सीमाच राहीलेली नसेल. पार कणाच मोडल्यासारखा झालं असेल अशा कुटुंबांच्या अर्थिक परिस्थितीचा नाही का? मग त्यांच्या (ऑनलाईन) शिक्षणाचं काय? त्यांच्या मानसिकतेवर याचा किती उच्च दर्जाचा विपरीत परिणाम होईल? हे एखाद्या मानसशास्त्रज्ञाला जाऊन विचारा अन् खात्री करून घ्या. तो हे च सांगेल की अशी कितीतरी हुशार , हलाखीच्या परिस्थितीत जगणारी, परंतु online ची काहीच सोय नसलेली लेकरं आता आपलं कसं अन् काय होणार?? या भीती आणि न्यूनगंडाने पछाडून भावनिक, मानसिकरित्या पूर्णतः उध्वस्त होतील. याचा विचार कोणी करतय का हो थोडा तरी? त्यांच्या आयुष्याचं पार मातेरं होऊन जाईल न्यूनत्व वा न्यूनगंडामुळे. ही न्यूनत्वाची भावना आयुष्यभर काही केल्या त्यांचा पिच्छा सोडणार नाही. साधं वर्गातील एकूणपैकी २-४ मुलांकडेच नवीन पेन वा वही नसेल तर त्यांचे चेहरे पार केविलवाणे-दीनवाणे होऊन जातात.. कारण आपण नाईलाजाने का होईना पण कशात तरी इतरांपेक्षा मागे आहोत. ही कमीपणाची बाब समजून ते उदास होतात. इथे तर चक्क काहीजण दररोज शिकणार... शाळेच्या संपर्कात असणार... आणि हे मात्र त्यापासून कोसो दूर... बरं ऑनलाईनवर काय सांगितलं वा शिकवलं गेलय ते एक बालसुलभ भावना म्हणून गल्लीत, कॉलनीत कधी ना कधी भेटून वर्गातल्या इतरांशी बोललं जातच. आता या लेकरांच्या मानसिक अवस्थेचा जरा विचार करा. त्यांच्या निरागस मनावर आपण न्यूनगंडाचे कितीतरी ओरखाडे उमटवणार आहोत आणि त्यात बहुतांशतः कमीपणाच्या भावनेचं मीठ सोबत असणारच आहे. यातून कायकाय भयानक परिणाम त्यांच्या मन, बुद्धी व भविष्यातील कृतींवर होणार आहेत; याचा विचार आपण करायलाच पाहिजे. तो न करता आहे ती च रीऽऽ ओढत रहाणं हे त्यांच्याचं नव्हे तर आपल्या सर्वांच्याच भविष्याच्या दृष्टिकोनातूनही फारच घातक असणार आहे. त्यांना दुर्लक्षून वा फक्त गृहीत धरून वा विकासप्रक्रीयेतून वजा करून फक्त आपणच हे राज्य वा देश नाही आहोत... हे अधोरेखित करून लक्षात ठेवावंच लागेल आपल्याला. हे आता फारसं जाणवणारं वा खटकणारं नसेलही कदाचित. पण आता या बालवयात त्यांच्या निरागस, कोवळ्या मनावर झालेल्या जखमा,

ओरखाडे पुढे वरचेवर चिघळत जातातच... समजा चूकून ( दमन केल्याने/ झाल्याने) त्या ओरखाडे / जखमा आता दृश्य स्वरूपात नाहीच चिघळल्या तरी छोट्या छोट्या प्रसंगातूनही त्या केव्हा ना केव्हा ज्वालामुखीप्रमाणे प्रचंड आवेगाने उफाळून बाहेर आल्याशिवाय रहाणार नाहीत. हे एक मानसशास्त्रीय सत्य आहे. यात माझं स्वतःचं तत्वज्ञान मुळीच नाही. बालवयातलील अशा ओरखाड्यांचे परिणाम मी अगदी आता ही समोर पहातोय. कधीकधी अनुभवतोय सुद्धा. ही वाटते तेवढी सहजावरी घेण्यासारखी सोपी बाब मुळीच नाही. याचा आताच गांभीर्याने विचार नाही केला तर अशा लेकरांचं भविष्य किती घातक रूप धारण करू शकेल याचा अंदाज लावणं फारच कठीण आहे. (तसा तो लावतानाही भल्याभल्यांची भांबेरी उडेल. तो लावत बसणं हे काही माझ्यासारख्या पामराचं काम निश्चितच नाही.)


तिसरा धोका म्हणजे ऑनलाईनचं लागणारं व्यसन... होय. अगदी बरोबर वाचलत आपण. व्यसनच...!! का? तर आतापर्यंतच्या वा लॉकडाऊनपर्यंतच्या काळातच कित्येक पालकांची ही समस्या आहे, की मुलं तासन् तास संगणक,मोबाईललाच चिकटून रहातात. ना खेळतात ना दुसरं काही काम करतात. अन् त्यातून त्यांना लठ्ठपणा, स्थूलपणा, दृष्टिदोष वा इतर ही काही आजार जडतात. अन् त्यात पुन्हा एकदा अधिकृतपणे २/३/४ वा ५ ही तास मोबाईल, संगणक वा लॅपटॉपच्या स्क्रीन ला चिकटून रहाण्याची, अभ्यासाच्या निमित्ताने का होईना एखादा घटक शोधत बसण्याची (तो शोधताना अनेक नको त्या साईटस् आपोआपच धडधडीत पुढे येतातच. कारण कोणतही प उघडण्यापूर्वीच इतरच कित्येक साईटस् नवीन उत्पादने घेऊन येतातच वा अनेक ललना थयथय नाचून नखरे दाखवताना दिसतात. हे वास्तव सर्वजणच अनुभवून आहोत.) सवय लागल्यावर पुन्हा लॉकडाऊन तर संपेल... पण ती सवय एवढ्या सहजासहजी जाईल का? तर नाहीच. जी सवय जास्त वेळापर्यंत टिकून रहाते , तिचं रूपांतर कालांतराने व्यसनात होतेच. अन् हे केव्हा होऊन जाते ते कळतही नाही. (ते काही बँड वाजवून वा मिरवणूक काढून नाही घडत. नकळतच घडते. खिशातून पाकिट मारल्यासारखं..) या मोबाईलच्या व्यसनातून (काही तुरळकच अपवाद वगळता) मोठी माणसं ही शक्यतो बाहेर पडूच शकत नाहीत. तर लेकरं तरी कशी पडणार? हे काम खरच एवढं सोपं आहे का? (तर नाहीच.) मग त्यासाठी पुन्हा नेमकं काय करायचं? (कोणालाच माहित नाही.) पुन्हा नेहमीप्रमाणे शाळेत आल्यावर त्या लेकराचं खरच शिक्षणात चित्त लागेल का? (जवळपास नाहीच.) घरी निवांतपणे बसून ऐकायचं सोडून शाळेत विशिष्ट शिस्तीत हे शक्य होईल का? (एवढं सहजासहजी तर नक्कीच नाही.) या घरीच ऑनलाईन शिकण्याच्या वा अभ्यासाच्या सवयींवर काहीच मानसशास्त्रीय परिणाम झालेला नसेल का?? (तो तर १००% होणारच होणारच..!!) तो पुन्हा दूर नेमका कसा करायचा? (कोण जाणे?) त्याचे तेवढे प्रभावी उपाय आपल्याकडे तयार आहेत काय? (सध्या तरी कोणालाच देणंघेणं नाही. ) ते राबवता येण्याएवढी सक्षम व आवश्यक ती मानसशास्त्रीय यंत्रणा आपल्याकडे उपलब्ध आहे काय? हे प्रश्न आता एवढे महत्वाचे नसतील वाटत वा वाटणारही नाहीत कदाचित. पण येत्या काळात ते कसे (???) सगळ्यांची त्रेधा तिरपिट उडवणार आहेत. ते सर्वांना फक्त पहायलाच नव्हे तर मस्तपैकी अनुभवायलाही मिळणारच आहे.

तेव्हा हे च सर्वजण ऑनलाईन च्या नावाने बोटे मोडत बसणार. म्हणजे संकट आपल्यावर नाही आलेलं तरी आपण जाऊन त्याला अगदी सन्मानपूर्वक आणि आग्रहाने घरी घेऊन यायचं आणि मग ते आता घरातून जातच नाहीत म्हणून स्वतःभोवतीच पिंगा घालीत गुरफटून बसायचं. हे काही साध्यासुध्या माणसाचं लक्षण नाहीच. फक्त आपल्यासारखा online शिक्षणप्रेमी महान आत्मा- परमात्माच(??!!!) असा पराकोटीचा पराक्रम करू शकतो. म्हणूनच आपण या online साठी जो काही अधिकचाच आटापिटा करीत आहोत तो किती घातकी, आत्मघाती वा सार्थकी ठरणार आहे. याचा आता प्राधान्याने विचार करणे गरजेचे आहे.

नाहीतर आपल्याच या नसत्या ऊठाठेवींतून गड पण गेला अन् सिंह पण गेला व्हायचं... अन् पुन्हा हाच आपल्या आताच्या हव्याहव्याशा ऑनलाईनचा प्रताप मात्र ठरेल आपल्याच डोक्याला नकोनकोसा ताप...!! म्हणूनच शिक्षण थांबू न देता चालू ठेवायचच आहे. पण ते सावकाश आणि नैसर्गिक पद्धतीनेच... हळूहळू शिकलं तरी काहीच बिघडणार नाही. काहीच नाही. कारण....

यह बात बिल्कुल मायने नहीं रखती की आप कितना धीमे चल रहे हैं, जब तक की आप रुकें नहीं।

त्यामुळेच शिक्षणप्रक्रीया हळूहळू तरी का असेना, औपचारिक वा अनौपचारिक का होईना, नसेल प्रत्यक्ष पुस्तकी पण सामाजिक, भावनिक, कला-कौशल्यातून का होईना पण चालूच राहीली पाहिजे. हे महत्वाचे. तेच खरे आणि अभिप्रेत असे जीवनशिक्षण आहे. त्यासाठी फक्त ऑनलाईनच रहावे असे काही नाही...!!



## जागतिक पटलावर 'शिक्षणयात्री' लवकरच ...

*होय, शिक्षणयात्री मासिक अल्पावधीत शिक्षण क्षेत्रातील अनुभूतींचं हक्काचं व्यासपीठ झालंय. शैक्षणिक,सामाजिक क्षेत्रातील विचारांना, उपक्रमांना सर्वदूर पोहचवण्यात 'शिक्षणयात्री' ला यश मिळालेय.*

*तरीही 'ऑनलाईन' काळ पहाता 'शिक्षणयात्री' मासिकाने आपला आवाका वाढवण्याचं ठरवलंय. लवकरच जागतिक पटलावर. 'शिक्षणयात्री' दिसणार आहे. कधीही कुठेही... संगणकावर.. मोबाईलवर शिक्षणयात्री वेबसाईटच्या माध्यमातून...सोशल मिडीयाच्या माध्यमातून सर्वदूर पोहचणार आहे. नव्या वर्षात...नव्या दमाचं शिक्षणयात्री पहायला आपल्याला नक्कीच आवडेल...*

*-संपादक*




# चला लिहूया थोडेसे...

## शिक्षण यात्री बोलके मुखपृष्ठ बाबत... प्रतिक्रिया!

**सचिन भाऊसाहेब पाटील**

शिक्षण पोटाला आधार देईलच याची शाश्वती नाही. मग पोट भरण्याची कला लहानपणीच शिकून घेतलेली काय वाईट ? अस्वस्थ करणारे चित्र !

**अमित विठ्ठल सरक,मालेगांव**

एक विदारक सत्य.... चित्रातून स्पष्ट होतंय. RTE पेक्षा...Right to live..साठी झगडणारी ही मुलं पाहिलं की RTE, मोफत शिक्षण वगैरे सगळं फेल वाटत.....

**शिरिष चौंदनकर, कुर्ला(मुंबई)**

हि मुले खरचं आयुष्य जगत आहे. त्यांच्यात निसर्गाशी एकरुप होण्याचा चांगला गुण आहे. ह्यांचे सामाजिक नाते आणि सामाजिक आंतरक्रिया खूप मस्त आहे. माझे बालपण आठवले. जे मी आता खूप हरवले आहे.

**पंकज प्रतापराव शिंदे,चोपडा(जळगांव)**

बिनभिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरू झाडे, वेली, पशु,पाखरे यांशी गोष्टी करू..... एकीकडे शालेय शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शासनस्तरापासून ते शाळा स्तरापर्यंत, गल्ली ते दिल्ली प्रयत्न होत असतांना वरील चित्र पाहून अनेक शिक्षण प्रेमींच्या मनात या विद्यार्थ्यांविषयी कणव निर्माण होणे सहाजिक आहे; पण भाकरीचा अर्धा चंद्र शोधण्यातच जिंदगी गेली असे म्हणणाऱ्या कविवर्य नारायण सुर्वे यांच्याच शब्दात आणि अनुभवात मांडायचे म्हटले तर वरील विद्यार्थ्यांना पुस्तके शिक्षणाची नव्हे तर पोटाची खळगी भरण्यासाठी व्यवहारातून दररोजच्या जीवनातून मिळालेले ज्ञान हे सर्वोत्तम आणि अत्यावश्यक आहे. उच्च शिक्षणाच्या गोष्टी या भरल्या पोटाने करता येतात हे त्रिकालाबाधित शाश्वत सत्य आहे म्हणून चित्रातील विद्यार्थ्यांकडे पाहून ते शिक्षणापासून वंचित आहेत किंवा पुस्तकाची पाने फाडून आपल्या व्यवसायासाठी त्यांचा उपयोग करीत आहेत असा विचार न करता उलट आपले पोट भरण्यासाठी त्यांनी केलेला हा व्यवसाय व उपक्रम प्रशंसनीय आहे असे मला वाटते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची नई तालीम या शिक्षण व्यवस्थेतून गांधीजींना हेच तर अपेक्षित होते!!!!!! हीच ती नई तालीम.....जीवन शिक्षण देणारी....

**स्वाती रमेश बोरसे,नंदुरबार**

हे चित्र एका मंदिराजवळ घेतलेले आहे,दोन मुलं शाळेत शिकत असावी बहुतेक! देवालय सुरू झालीय पण शाळा नाही, शेंगा विकण्यासाठी पुस्तकाचा वापर यावरून मुल शाळेच्या प्रवाहापासून दूर झालीय ,ऑनलाईन शिक्षण शहरासाठी असेल ही पण ग्रामीण भागात नाहीच नाही, हे मूल काहीतरी काम करत आहेत, शिक्षणाची मदत घेऊन आणखी skill जर प्राथमिक शाळेत विकसित झाले असते तर नाविन्यपूर्ण करता आले असते आणि अधिक फायदा झाला असता.

**डॉ. शैलजा भानुदास सोनवणे,शिरपूर(धुळे)**

चिंतनीय पोस्ट , विकसनशील देशाची उगवती पिढीची ह्रदय हेलावणारी वास्तवता. देशाचे भावी आधार स्तंभ ,पोटाची खळगी भरण्यासाठी कृतीशील. ,नाकारतां न येणारे सत्य. भयानक ,शब्द थांबतात.

**प्रदीप पाटील,पुणे**

आजही भारताची खरी गरज धर्म जातपात याची नसून त्यांना पायावर उभे करेल आणि बुद्धीला विज्ञानवादी बनवेल अश्या शिक्षणाची आहे. दारिद्र्य आणि अज्ञान आपल्या देशातील अनेकांचे बालपण हिसकावून घेत आहे आणि आरोग्यपूर्ण व समंजस तारुण्याचा पाया डळमळीत करत आहे

**श्रीमती. चंदन नंदकिशोर सत्तेसा, शिरपूर (धुळे)**

नविन वर्षाची प्रत्तेक व्यक्ती वाट पाहत असतो.कारण नविन स्वप्न ,नविन संकल्प केलेले असतात.त्याच प्रमाने २०२०या वर्षाचे सर्वच वाट पाहत होते .सुरुवात चांगली झालीही पण चोर पावलांनी कोविड-१९ आला आणि बघता बघता ब्रम्हराक्षस झाला .त्याने सगळच जग थांबवल.लॉकडाऊन मुळे शाळा,कॉलेज, महाविद्यालय बंद झाली. ह्या मुळे मुलं घरीच बसून अभ्यास करू लागली, ऑनलाइन शिक्षण घेऊ लागली यामुळे त्यांच्या आईवडिलांच्या रोजगारावर देखील फरक पडला. मुलेदेखील लहान-मोठे रोजगार शोधू लागले अशीच धडपड करताना आई-वडिलांना मदत करताना मुलं या मुखपृष्ठा मध्ये दिसत आहेत.

**चंपालाल पाटील,शिरपूर (धुळे)**

फार बोलके चित्र आहे... बालवयात वि. उपजिविकेसाठी थोड्याफार प्रमाणात खाऊ.. फुले विकताय.. पण संपादकांनी त्या मुखपृष्ठामागे फार बोलका भाव प्रकट केलेला वाटतोय... बालमजुरी - जे वय शिकण्याचे आहे त्या वयातच उपजीविकेचा प्रश्न... आणि अशी अनेक बालके आम्हाला दृष्टीसपडताततही..पण समाजमन त्यावर तोडगा काढायला तयार नाही... कोणाच्या तरी पापाने हे झालं आहे.. कारण ही व्यवस्था अशा कुटूंबासाठी राबत नाही यांच्या दावण्या दुसरीकडे च बांधलेल्या आहेत... असो.. बालवयात शिक्षण अपेक्षित आहे. ते शिक्षणाच्या यात्रेकरुंना जरी कळले तरी संपादकांचा हेतू साध्य होईल असे वाटते... मला हे चित्र समजले आहे ते मांडण्यातचा प्रयत्न केला आहे

**राजेंद्र यशवंत पाटील,शिरपूर(धुळे)**

आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थी हे भगवंताच्या तीर्थस्थळी एक संघर्षशील जीवन जगून शाळा बंद असतांनाही छोट्या उद्योगाच्या

माध्यमातून आपल्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी धडपड करीत आहेत.व्यवसाय करीत असतांना माता सरस्वतीच्या ज्ञानसाधनारूपी शिक्षणाकडेही त्यांनी दुर्लक्ष केलेले नाही.लहान बालकांच्या चेहर्यावरील आत्मविश्वास आम्हा सर्वांना निश्चितच प्रेरणादायी आहे.आपली प्राप्त परिस्थिती शिक्षणाच्या आड येऊ न देता यत्न तो देव जाणावा या उक्तीप्रमाणे ज्ञानसाधनेचा दीप आपण अखंड तेवत ठेवला पाहिजे ही प्रेरणा आपल्याला ह्या तेजोमय मुखपृष्ठाच्या निरिक्षणातुन मिळते.

**सुधीर कांबळे,उमरगा(उस्मानाबाद)**

खर तर हे चित्र केवळ मुलांचं नाही,हे चित्र आहे लोकशाही सक्षमपणे राबवू न शकणाऱ्या निष्क्रिय राजकारण्याचं,हतबल,गोंधळलेल्या समाजाचं आणि सब पढ़े सब बढ़े म्हणणाऱ्या शिक्षण व्यवस्थेचं ! शेजारी पडलेल्या पुस्तकाच्या पत्रावळया तमाम व्यवस्थेचा धिक्कार तर करत नसतील ? हातातले हार सत्तास्थानी असलेल्या (घरातल्या आणि देशाच्या सुध्दा !) वडीलधारी मंडळीचा मूक निषेध तर नोदवत नसतील ? की हे हार उद्याच्या विवेकी,समृद्ध,कल्याणकारी भारताच्या कबरीसाठी सज्ज असतील ? याहीपेक्षा विदारक चित्र रोज पाहतोय,त्यामुळ फारसा हेलावून वगैरे जात नाही,पण तरीही चित्र बदलेलं अशी आशा वाटतेय माय मरावी पण आशा मरु नये

**कल्पेश कुलकर्णी,धुळे**

शिक्षणा पासून वंचित

## ✻शिक्षकांनो....लिहिते व्हा!✻

**जानेवारी-फेब्रुवारी जोड अंकासाठी**

✻ आठवणी शिक्षक होतांनाच्या..(डी.एड/बी.एड होतानाच्या मजेशीर अनुभव किंवा आठवणी १००/१५०शब्दात)

✻ न थांबता-नोकरी करत असतांना आता कशाला शिकायचे?हा विचार न करता घेतलेले उच्च शिक्षण, विविध पदव्या पदविका,कोर्सेस याविषयी आठवणी

✻ शिक्षक किंवा विद्यार्थी यशोगाथा

✻ आमची संस्था आमचे उपक्रम

✻ शैक्षणिक सद्यपरिस्थिती /आव्हाने आणि उपाय

✻ नवनिर्मित शैक्षणिक साहित्य व उपयोग

✻ लॉक अनलॉक नाविन्यपूर्ण बदल लॉक डाऊन चे अनुभव

✻ यासह स्वतः लिहिलेल्या कथा कविता लेख पाठवा.

✻शब्दमर्यादा - तीनशे ते चारशे शब्द

**मुदत ७ जानेवारी पावेतो.**

**सोबत :**

✻ लेखासंबंधी दोन फोटो, स्वतःचे पूर्ण नाव,पत्ता,शाळा, मोबाईल नंबर, पासपोर्ट फोटो पाठवावा.

पाठवण्याचा पत्ता-

मेल- shikshanyatri11gmail.com / What's app- 9850964601

शिक्षणयात्री

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट - शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष : 8208301001 shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2018-20










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

With pay any app

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2018-20

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ................................................
................................................
................................................

Pragati Arts Shirpur 8421356261